**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६९७/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर,** **------ अपीलकर्ता**
**अजना इस्टेट, चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर, भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी, वांद्रे कार्यालय,**
**जिल्हा भ्रष्टाचार विरोधी कमिटी,**
**मुंबई उपनगर जिल्हा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**जिल्हाधिकारी, वांद्रे कार्यालय,**
**जिल्हा भ्रष्टाचार विरोधी कमिटी,**
**मुंबई उपनगर जिल्हा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर जिल्हा, १० वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि.५.५.२००७ रोजी अर्ज करु भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन महाराष्ट्र अण्णा हजारे प्रणित कर्नल डॉ. रमेश वासुदेव यांचे वतीने अपिलकाराने दि.१५.३.२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.११.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याले अपिलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे दि.२१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्रीमती जयश्री बाबर या सुनावणीसाठी हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्रीमती बाबर यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे दि. ५.५.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन महाराष्ट्र अण्णा हजारे प्रणित कर्नल डॉ. रमेश वासुदेव यांचे वतीने अपिलकाराने दि.१५.३.२००६ रोजी त्यांच्या पती विरोधात भारतीय दंड संहिता (I.P.C.) कलम ४९३-अे च्या दिलेल्या तक्रार अर्जावर कार्यालयाच्या कमिटीद्वारे केलेल्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केली होती.

अपिलकाराने दि.१५.३.२००७ रोजी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या अर्जाचा सर्वतोपरी शोध घेतला. परंतु अर्ज आढळून आला नाही. म्हणून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपिलकारास जून, २००७ मध्ये कळविले. तसेच, अपिलकाराकडे असलेल्या अर्जाची प्रत, अपिलकारास कोणत्या प्रकारची माहिती हवी याबाबतचा तपशील सोबत घेऊन व्यक्तिशः कार्यालयात हजर रहाण्याबाबत कळविले. त्यानुसार आवश्यक असलेल्या चौकशीच्या कागदपत्रांच्या प्रती देण्याची तयारी दर्शविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे अपिलकाराचे पती श्री.चंद्रकांत बाबर यांना व गुहेगारांना शासकीय सेवेतून निलंबित करण्याबाबत, सदर प्रकरणी भ्रष्ट शासन यंत्रणेची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत, केलेल्या कारवाई संबंधी माहिती मिळण्याबाबत दि. ११.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराचा दि.१५.३.२००६ चा तक्रार अर्ज भ्रष्टाचार निर्मूलन समितीशी संबंधित नसून तो हुंडाबळी समितीशी संबंधित आहे. तरी अपिलकाराने संबंधित समितीशी संपर्क साधावा असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन व अपिलकाराच्या दि.१५.३.२००६ च्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकाराचे पती श्री.चंद्रकांत बाबर यांनी व त्यांच्या सासरच्यांनी हुंडयासाठी त्यांना त्रास दिला. उभयतांमध्ये घटस्फोट झालेला नसताना १९९० मध्ये दुसरे लग्न केले. अपिलकाराचे पती मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत आहेत असे दिसते. अपिलकारास वारसा हक्क व पोटगी मिळाली नसल्याचे गा-हाणे (Grievance) आहे. सदर बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (च) मध्ये येत नाही. याकरिता अपिलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने मी या प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७००/०२**

**श्री.व्ही. टी. वोरा,** **------ अपीलकर्ता**
**चेअरमन, सेवेंथ को.ऑप.हौ.सोसा.लि.**
**बुध्द टेंपल लेन, परेल, मुंबई- ४०० ०१२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/साऊथ वॉर्ड,**
**डॉ.बी.अे.आंबेडकर रोड, परळ नाका,**
**परेल, मुंबई -४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/साऊथ वॉर्ड,**
**डॉ.बी.अे.आंबेडकर रोड, परळ नाका,**
**परेल, मुंबई -४०० ०१२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. व्ही. टी. वोरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), एफ/दक्षिण विभरग, बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई यांचेकडे दि. १२.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. सिटी सर्व्हे क्र.७८० येथील प्लॉट क्र.८ वर श्रीमती पी.ए. खैराबादी यांचेकडून मोकळया जागेवरील गॅरेजच्या दुरुस्ती/ बांधकामाबाबत, सदर गॅरेज तोडून टाकण्याबाबत केलेल्या तक्रारीसंबंधी केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. १२.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपिलकाराने केलेल्या तक्रारीसंबंधी प्रकरण तपासाधीन असल्याचे व तृतीय पक्षाच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिवितास धोका असल्याने उक्त अधिनियमातील कलम ८ (जी) व (एच) नुसार माहिती देण्यापासून वगळण्यात आले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास वरील दि.१२.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

जन माहिती अधिका-यांनी श्रीमती पी.ए. खैराबादी यांना ७ वा स्वर्ग सहकारी गृहनिर्माण सोसायटी सिटी सर्व्हे क्र.७८० येथील प्लॉट क्र.८ वरील रिकाम्या जागेतील गॅरेजच्या दुरुस्तीच्या कामास दि. २०.१०.२००६ च्या पत्रान्वये परवानगी दिली होती. अपिलकाराची तक्रार विचारात घेऊन क्र. एमएस/१६७१६/बीएफ, दि.२०.१०.२००६ च्या पत्रान्वये दिलेली परवानगी वापस घेण्यात आली. श्रीमती खैराबादी यांचे वास्तुशास्त्रज्ञ सदर गॅरेजचे बांधकाम नियमित करुन घेण्याकरिता सक्षम प्राधिका-यांकडे संपर्क साधत असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ११.१२.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई यांचेकडे दि.१३.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २४.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि. १७.४.२००७ रोजी आदेश पारित केले. श्रीमती पी.ए.खैराबादी यांनी त्यांचे प्लॉट क्र.८ वरील गॅरेजचे बांधकाम नियमित करुन घेण्याकरिता त्यांनी नेमणूक केलेल्या वास्तुशास्त्रज्ञामार्फत इमारती प्रस्ताव विभागाकडे संपर्क साधण्यात येत असल्याचे श्रीमती खैराबादी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी सांगितले. बराच कालावधी लोटून गेला तरी वास्तुशास्त्रज्ञाकडून प्रतिसादर मिळत नसल्याने श्रीमती खैराबादी यांच्या गॅरेज बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियमांतर्गत कलम ३५१ खाली नोटीस देण्यात आली. यामुळे श्रीमती खैराबादी यांनी गॅरेजचे बांधकाम नियमित करण्याकरिता डी.एम.सी. (झेड-II) कडे संपर्क साधला. गॅरेजचे बांधकाम/ दुरुस्ती माफक असल्याने ते डी.एम.सी. (झेड-II) यांनी मंजूर केले. तसेच कलम ३५१ ची नोटीस मागे घेवून श्रीमती खैराबादी यांना तसे कळविण्यांत आले.गॅरेज बांधकामासाठी श्रीमती खैराबादी यांनी संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नव्हते. त्यामुळे गॅरेज बांधकाम अधिकृत होऊ शकत नसल्याचा अपिलकाराने युक्तिवाद केला. जागेचे खेरदी करारपत्र झालेले नाही. श्रीमती खैराबादी या जागेच्या मालक असल्याने संस्थेच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचा जन माहिती अधिका-यांनी युक्तिवाद केला. श्रीमती खैराबादी यांनीही उक्त जागेची मालकी त्यांची असल्याचा युक्तिवाद केला. श्रीमती खैराबादी यांची जागेची मालकी असेल तर त्या सर्व संबंधित कर शासनाकडे का भरत नाहीत असा अपिलकाराने युक्तिवाद केला. खरेदी करारपत्रासंबंधी विधी विभागाचा सल्ला घेण्यात यावा असा जन माहिती अधिका-यांनी मुद्दा मांडला. त्यानुसार सदर कारणासाठी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी स्थगित केली व विधी विभागाचा सल्ला प्राप्त झाल्यानंतर पुढील सुनावणी घेण्याचे नमूद करुन तसे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २७.८.२००८ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, श्री.वसंत पटवर्धन, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री. सुनिल म.वैद्य तसेच अपिलकार श्रीमती खैराबादी हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, श्रीमती खैराबादी यांच्या गॅरेजच्या बांधकाम दुरुस्तीस बृहन्मुंबई महानगरपालिकेल्या डी.एम.सी. (झेड-II) विभागाने मंजुरी दिली. संस्थेच्या ना हरकत प्रमाणपत्राअभावी बांधकाम अधिकृत होऊ शकत नाही असा अपिलकाराचा मुद्दा आहे. जागेच्या मालकीसंबंधी /खरेदी करारपत्रासंबंधी विधी विभागाचा सल्ला घेण्यात येत असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, विधी विभागाचा सल्ला प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार कारवाई करुन तशी अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी तात्काळ माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७१७/०२**

**श्री.डेन्झील गोन्साल्वीस, ------ अपीलकर्ता**
**फ्लॅट सी/८, मॉन्टीनो अपार्टमेंट,**
**३५, वरोडा रोड.**
**वांद्रे (प.) मुंबई- ४०० ०५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव,,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,**
**गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१. ------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. डेन्झील गोन्साल्वीस, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.२९.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. बांद्रा साईनाथ एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था सीटीएस क्र.६४८-ए, वांद्रा व्हीलेज, चिंचपोकळी रोड, वांद्रे (प.) मुंबई-५० (नोंदणी क्र.एमयुएन/एसआरए/एचएसजी/टि.सी./१०७११/२००३, दि. १३.१०.२००३) या संस्थेची माहिती-

(१) संस्थेने नोंदणीकरिता प्रस्तावासोबत कोणती कागदपत्र जोडली होती त्याच्या प्रती.

(२) सदर प्रस्ताव सादर करणारे जबाबदार अधिकारी कोण.

(३) सदर प्रस्ताव सादर करताना सर्व संबंधित अधिका-यांनी नोंदविलेले अभिप्राय.

(४) संस्थेचा नोंदणीचा प्रस्ताव सरतेशेवटी कोणत्या अधिका-यांनी मंजूर केला त्या अधिका-याचे नांव.

अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता चलनाच्या स्वरुपात शुल्काचा भरणा मुदतीत करावा असे दि. १३.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. परंतु किती शुल्क किती फोटोप्रतीसाठी भरावे याबाबत अपिलकाराने दि. २६.३.२००७ च्या पत्रान्वये विचारणा केली. जन माहिती अधिका-यांनी किती शुल्क भरावयाचे हे

अपिलकारास कळविले नाही. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. २६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिका-यांच्यावतीने सहायक सहकारी अधिकारी श्री.डी.आर.पाटील हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने मागणी केलेली माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दर्शविली. परंतु, माहितीपोटी किती शुल्काचा भरणा करावा हे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी मागणी करुनही कळविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकार माहिती मिळण्यापासून दिर्घकाळ वंचित राहिले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास आवश्यक ती माहिती ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहिती अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची, प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७२३/०२**

**श्री. एडविन डी. डिसोझा,** **------ अपीलकर्ता**
**सी-१०८, वर्सोवा ज्युपीटर को.ऑप.हौ.सो.लि.**
**लोखंडवाला संकुल, ४ क्रॉस रोड,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**जिल्हा निबंधक सहकारी संस्था (३),**
**गृहनिर्माण भवन, रुम नं.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**के पश्चिम गृहनिर्माण भवन, रुम नं.६९,**
**गृहनिर्माण भवन, रुम नं.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.एडविन डी.डिसोझा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई यांचेकडे दि.२.३.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. वर्सोवा-ज्युपिटर को.ऑप.हौ.सोसायटी लि. प्लॉट १०, हिरानंदानी इस्टेट ऑफ जे.पी.रोड, अंधेरी, मुंबई, कायदा कलम ७८ खाली प्रशासक म्हणून नेमणूक केल्याबाबत अनुषंगिक एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने दि.२९.३.२००७ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करण्यात आली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिका-यांच्या वतीने सहकारी

अधिकारी श्रेणी-१, हे हजर होते. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केंलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.एडविन डी.डिसोझा, यांनी केंद्रिय माहितीच्या अधिकारात दि.२ मार्च,२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, यांचेकडे अर्ज करुन वर्सोवा-ज्युपिटर को.ऑप.हौ.सोसायटी लि. प्लॉट १०, हिरानंदानी इस्टेट ऑफ जे.पी.रोड, अंधेरी, मुंबई, या संस्थेवर संस्थेची व्यवस्थापकीय समिती निष्प्रभावित करुन त्या जागी प्रशासकाची नेमणूक केल्यासंबंधीची अनुषंगिक पाच मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता व जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेला लेखी अहवालाची तपासणी केली असता असे दिसून येते की, अपिलकाराने उक्त संस्थेच्या कामकाजाबाबत जन माहिती अधिका-या कडे यापूर्वी दि. १६ मार्च, २००७ च्या पत्रान्वये तक्रार केली होती. सदर तक्रारीस अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी संस्थेच्या दप्तराची तपासणी केली. तपासणीअंती आढळून आलेल्या दोषांची पूर्तता करण्याकरिता तपासणी अहवालाची प्रत संस्थेस देण्यात आली. संस्थेने विहित कालावधीत म्हणजे १५ दिवसांत खुलासा सादर केला नाही. दि. ११.११.२००५ रोजी खुलासा सादर केला. तपासणी अहवालात आढळून आलेले गंभीर दोष व संस्थेने सादर केलेला खुलासा यामध्ये विसंगती दिसून आली. यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७८ अन्वये संस्थेच्या व्यवस्थापक समितीस कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. त्यावर सन २००६ मध्ये चार वेळा सुनावणी आयोजित करुन सस्थेची व्यवस्थापकीय समिती निष्प्रभावित करुन त्या जागी प्रशासक म्हणून श्री. एस.एम.मोहिते, सहकारी अधिकारी, श्रेणी-१ यांची नेमणूक करण्याबाबत दि. ३१.५.२००६ रोजी आदेश पारित केले. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई यांचेकरिता आदेश दि. २०.६.२००६ नुसार दि. ३१.५.२००६ च्या आदेशास स्थगिती देण्यात आली होती. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी

दि.३१.५.२००६ चे व्यवस्थापक नेमणूकीचे आदेश दि. २१.७.२००८ च्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधकांनी कायम केले आहेत. त्यानुसार आता श्री.मोहिते यांचे जागी श्री.पगारे, सहायक सहकारी अधिकारी यांची दि. २१.८.२००८ च्या आदेशाने प्रशासक म्हणूंन नियुक्ती केली. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांना सुनावणीच्यावेळी दि. २३.८.२००८ च्या पत्रानुसार सादर केली. यावरुन विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७१८/०२**

**श्री. रॉयस्टॉन व्ही.परेरा,** **------ अपीलकर्ता**
**रिटॅलिन १२०, सेंट ब्राझ रोड,**
**विलेपार्ले (प.), मुंबई- ४०० ०५६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा,**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के /पश्चिम वॉर्ड,**
**अंधेरी (प.) मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, , के /पश्चिम वॉर्ड,**
**अंधेरी (प.) मुंबई.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रॉयस्टॉन व्ही.परेरा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.२.१.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. जे.बी.नायर रोड, जूहू, मुंबई, येथील घर क्र. जी-१२ येथे श्री. हाजी एम.सी.अब्दूल कादर हे मे.टुरिस्ट हॉटेल चालवितात. या जागेची मालकी अपिलकाराची आहे. सदर हॉटेल व त्या इमारतीतील बांधकामाला सन १९८० साली बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी दिली होती. नंतर ती अनधिकृत बांधकामामुळे रद्द करण्यांत आली. त्यानंतर ते अनधिकृत बांधकाम प्रशासनाने दंड आकारुन नियमित केले. त्याची सर्व कागदपत्र उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.१९.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपिलावर दि.५.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आल्याचे दि.२७.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविण्यात आले. अपिलकारास सदर पत्र दि. ५.३.२००७ रोजी दुपारी ४.३० वाजता मिळाले. त्यामुळे या प्रकरणी सुनावणीकरिता पुढील तारीख द्यावी अशी दि. ५.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकाराने विनंती केली. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधी उलटून गेल्यानंतर दि. ३.३.२००७ च्या पत्रान्वये अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी शोध घेऊनही कागदपत्र उपलब्ध नसल्याचे कळविले. त्यामुळे अपिलकाराने व्यथित होऊन दि. १३.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२८.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री. एम.बी.शिंदे, श्री.एस.एस.बंडगर तसेच अपिलकार श्री. आर.व्ही.परेरा हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती सन १९८० सालची असून कार्यालयात शोध घेतला तरी कागदपत्र सापडत नाहीत असे विहित कालावधी उलटून गेल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ३.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. अपिलकाराने मागितलेल्या कागदपत्रांचा परत जाणिवपूर्वक शोध घ्यावा. कागदपत्र उपलब्ध असल्यास अपिलकारास माहिती दयावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १३.३.२००७ रोजी प्रथम अपिलावर आदेश पारित केले. त्यानंतर शोध घेतल्यावर उपलब्ध झालेली फाईल अपिलकारास तपासणीकरिता दिली. हॉटेल दुरुस्तीकरिता दिलेले दि. १५.७.१९८० चे परवानगी पत्र, दुरुस्तीकरिता दिलेल्या परवानगीपेक्षा अधिक दुरुस्ती बांधकाम केल्याने कलम ३५१ नुसार दि. २४.११.१९८० रोजी दिलेली नोटीस, दुरुस्ती बांधकामास दिलेली परवानगी रद्द केल्याबाबतचे दि. २९.११.१९८० चे पत्र, टुरिस्ट हॉटेल मालकास दिलेली कारणे दाखवा नोटीसीची प्रत, रु.३५६१२/- एवढी शास्ती लावून अनधिकृत

बांधकाम नियमित करुन दिल्याबाबतच्या कागदपत्राच्या प्रती अपिलकारास दिल्या. त्याव्यतिरिक्त अपिलकाराने मागितलेली माहिती जाणिवपूर्वक शोध घेऊनही सापडलेल्या फाईलमध्ये सर्व कागदपत्र उपलब्ध नसल्याने माहिती देता आली नसल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले. वरील परिस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने फार जूनी म्हणजे सन १९८० ची माहिती मागितली आहे. यासंबंधीची कागदपत्र शोधून उपलब्ध माहिती अपिलकारास जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिली. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यात जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी कुचराई केली असे म्हणता येणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/७१/०२**

**श्रीमती लक्ष्मी नारायण अडवळ,** **------ तक्रारदार**
**अडवळ प्लॉट, गोखले मार्ग,**
**मुलूंड (पूर्व), मुंबई- ४०० ०८१.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका म्युनिसिपल ऑफीस बिल्डिंग,**
**टी विभाग, लाला देविदयाळ मार्ग,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

तक्रारदार श्रीमती लक्ष्मी नाराण अडवळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयेगाकडे दि. २९.७.२००८ रोजी पुढीलप्रमाणे तक्रार दाखल केली.

" श्री.पागे यांची नियम रेषेप्रमाणे रस्ता रुंदीकरणामध्ये येणारी जमीन किती चौ.मी.संपादित करावयाची आहे. श्री.पागे यांनी नियत रेषेप्रमाणे रस्ता रुंदीकरणामध्ये येणारी किती फूट जमीन सोडलेली आहे. सदर जमीन संपादित करुन गोपाळ कृष्ण गोखले मार्ग तयार करण्यात आला आहे काय ? अर्जदाराची बेकायदेशिररित्या दुकाने तोडली, तोडलेली दुकाने अर्जदारास कशी व केव्हा बांधून देणार आहेत " याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, मुलूंड यांचेकडे दि. ९.८.२००६ च्या माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिमंडळ-६) घाटकोपर यांचेकडे प्रथम अपील सादर केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे दि. ४.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.३०.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. तक्रारदाराने मागितलेली माहिती ३० दिवसांचे आत द्यावी असे राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी आदेश पारित केले. विहित कालावधी उलटून गेला तरी जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली. सदर तक्रारीवर दि. १४.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. तक्रारदार श्रीमती अडवळ हजर नव्हत्या.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-याने लेखी अहवाल सादर करुन पुढीलप्रमाणे युक्तिवाद केला.

श्रीमती अडवळ यांनी मुलुंड (पूर्व) येथील गोपाळ कृष्ण गोखले मार्गाच्या ६० फुटी रस्ता रुंदीकरण रेषेबाबत माहितीच्या अधिकाराखाली विहिध अर्ज यापूर्वी सादर केलेले असून त्यास या कार्यालयामार्फत आवश्यक ती माहिती योग्य त्या कालमर्यादेत देण्यात आलेली आहे.

श्रीमती अडवळ यांच्या सर्व माहिती अधिकाराच्या अर्जामध्ये नेहमीच मुद्देसूद माहिती मागविण्याऐवजी विविध घटनांचा उल्लेख केलेला असतो व त्यातून त्यांना आवश्यक असलेली माहिती शोधून काढणे कठीण जाते. तथापि, श्रीमती अडवळ यांना टी विभाग कार्यालयात उपलब्ध असलेली त्यांच्या विषयासंदर्भातील सर्व माहिती वारंवार देण्यात आलेली आहे.

श्रीमती अडवळ यांनी दिनांक २९.७.२००८ रोजी मा.माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीनुसार श्रीमती अडवळ यांना त्यांच्या दि. ९.८.२००६ च्या मूळ अर्जाला उत्तरादाखल दिलेली माहिती त्यांना दि. १३.८.२००८ रोजी पुन्हा देण्यात आलेली आहे.

मा. माहिती आयोगाने दि. ५.५.२००८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार द्यावयाची माहिती या कार्यालयातर्फे पूर्वीच देण्यात आलेली होती. परंतु दि. ५.५.२००८ च्या आदेशानुसार ती माहिती पुन्हा देण्याबाबत झ ालेल्या दिरंगाईबाबत दिलगिरी व्यक्त करीत आहोत.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदारांनी माहितीच्या अधिकारात वेळोवेळी अर्ज करुन माहिती मागितली. जन माहिती अधिका-यांनी तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. परंतु तक्रारदाराचे समाधान झाल्याचे दिसत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, तक्रारदाराने जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून संबंधित फाईलची तपासणी करावी. त्यानंतर तक्रारदारास आवश्यक ती माहिती कार्यालयातील फाईलवर उपलब्ध असल्यास नियमानुसार अपिलकारास शुल्क आकारुन जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६१/०२**

**श्री. एम. एस. शेख,** **------ अपीलकर्ता**
**अे/७०२, धर्ती कॉम्प्लेक्स,**
**एव्हरशाईन नगर, मिरा रोड, ठाणे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**सह संचालक (वैद्यकीय),**
**आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नियंत्रक, लेखा व लेखा परिक्षा,**
**आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. एम. एस. शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, लेखा व लेखा परीक्षा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचेकडे दि. १५.१.२००७ रोजी अर्ज करुन सामान्य रुग्णालय, अमरावती, लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णाल मुर्तुजापूर, स्त्री रुग्णालय, अमरावती येथील आर्थिक घोटाळा प्रकरणी एकूण १० मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. ७.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती नाकारली. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (वैद्यकीय), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे दि.१५.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.३.२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपिलावर दि. २.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, वैद्यकीय, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, डॉ. ना.ज.राठोड, श्री. नि.क.पाटील, सह संचालक (अर्थसंकल्प), जन माहिती अधिकारी तथा नियंत्रक, लेखा व लेखा परिक्षा, पुणे, श्री. हि.ल.पवार, तसेच अपिलकार श्री. एम.एस.शेख हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, सामान्य रुग्णालय, अमरावती, लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णाल मुर्तुजापूर, स्त्री रुग्णालय, अमरावती येथील आर्थिक घाटाळा प्रकरणी अपिलकाराने एकूण १० मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. सदर प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यामध्ये प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला असून (एफ.आय.आर.) पोलीस यंत्रणेमार्फत तपास चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणें किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियेमध्ये अडथळा येईल अशी माहिती प्रकट करण्यास अपवाद करण्यांत आला आहे. या कारणावरुन जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारली. या परिस्थितीत मी असा निर्णय देत आहे की, कथित आर्थिक घोटाळा प्रकरणी पोलीस चौकशी पूर्ण होऊन संबंधित आरोपी विरुध्द गुन्हा दाखल झाल्यास अपिलकारास माहिती उपलब्ध्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४९/०२**

**श्री. सुनिल मधुकर, वाखरकर,** **------ अपीलकर्ता**
**इ-५/बी-००७, हायवे पार्क, ठाकूर स्कूल,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय,**
**विलेपार्ले (प.), मुंबई-४०० ०५६.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय,**
**विलेपार्ले (प.), मुंबई-४०० ०५६.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. सुनिल मधुकर वाखारकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई यांचेकडे दि.१९.१२.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. " मे, २००६ ते जून, २००६ मध्ये एन.एम. महाविद्यालयात कार्यरत असणा-या प्राचार्यांना मिठीबाई महाविद्यालयातील शाळा सोडल्याच्या दाखल्यावर सहया करण्यास शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयाकडून पूर्व परवानगी देण्यात आली होती का ? असल्यास, परवानगी मिळाल्याच्या पत्राची प्रत मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, तथा प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई यांचेकडे दि. १९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ६.२.२००७ च्या पत्रान्वये खालील माहिती दिली.

" अपिलकारास मिठीबाई महाविद्यालयातून निलंबित करण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे. त्यामुळे उक्त अधिनियमातील कलम ८ (एच) नुसार माहिती देण्यापासून वगळण्यात आले असल्याने माहिती नाकारली. तसेच अपिलकाराविरुध्दच्या विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय येईपर्यंत त्यांनी मिठीबाई महाविद्यालयातील माहिती मागू नये. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी न घेता पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय, व एन. एम. महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई तसेच जन माहिती अधिकारी अधिकारी तथा उप प्राचार्य, मिठीबाई महाविद्यालय, व एन. एम. महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई तसेच अपिलकार श्री. सुनिल वाखारकर हे हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकारास मिठीबाई महाविद्यालयातून निलंबित करुन त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. या कारणावरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(एच) चा आधार घेऊन अपिलकाराने मागितलेली माहिती नाकारता येत नाही. एन. एम. महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राचार्यांना मिठीबाई महाविद्यालयातील शाळा सोडल्याच्या दाखल्यावर सहया करण्यास शिक्षण उप संचालकांकडून पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते का ? असल्यास तशी परवानगी मिळविली होती का ? याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास ३० दिवसांचे आंत माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३७/०२**

**श्री. सुनिल मधुकर, वाखरकर,** **------ अपीलकर्ता**
**इ-५/बी-००७, हायवे पार्क, ठाकूर स्कूल,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०९८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कुलसचिव (वित्त व लेखा विभाग),**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई-४०० ०९८.** **------- उत्तरवादी**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. सुनिल मधुकर वाखारकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव (वित्त व लेखा विभाग) मुंबई विद्यापीठ, यांच्याकडे दि.११.४.२००७ रोजी अर्ज करुन डॉ.डी.एन.वोरा यांनी दि.२७.३.२००६, २८.३.२००६ रोजी टी.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस.सी. सकाळीच्या सत्रात झालेल्या संयुक्तिक परिक्षेसाठी केंद्र प्रमुख म्हणून काम केल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. सहायक माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि. १०.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि. ११.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३१.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. परंतु आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

अपिलकाराने दि. ११.४.२००७ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिनांक १०.५.२००७ रोजी दिली असल्याचे दिसून येते. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर समर्पक असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७५२/०२**

**श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर,** **------ अपीलकर्ता**
**अंजना इस्टेट चाळ नं.१२, रुम नं.४,**
**भाटीया हॉस्पिटलसमोर, भांडूप व्हिलेज रोड,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ समुपदेशक,**
**राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन,**
**म्हाडा बिल्डिंग, पोटमाळा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१..**

**जन माहिती अधिकारी तथा**
**राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन,**
**म्हाडा बिल्डिंग, पोटमाळा,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्रीमती जयश्री चंद्रकांत बाबर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.५.५.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

अपिलकाराने दि. २३.१.२००४ रोजी आमदार तारासिंगच्या वतीने दिलेल्या तक्रारीद्वारे सदर प्रकरणामध्ये श्रीमती निर्मला प्रभावळकर यांनी फेब्रूवारी ते एप्रिल, २००४ मध्ये शासनाला आयोगातर्फे काढलेली नोटीस व त्याच्या शिफारशीची प्रत, दि. १५.११.२००५ रोजी व दि. ५.१.२००७ रोजी आयोगातर्फे पोलिसांना दिलेला अर्ज, अपिलकाराने दि. १५.३.२००७ बाबतच्या पत्रावर आयोगाने केलेली कार्यवाही व त्याच्या शिफारशीच्या अहवालाची प्रत मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी दि. ८.५.२००७ च्या पत्रान्वये विहित शुल्क कार्यालयात भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत अपिलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ समुपदेशक, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.९.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले

नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, राज्य महिला आयोग, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, राज्य महिला आयोग, तसेच अपिलकार श्रीमती जयश्री बाबर हजर होते. सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

अपिलकार श्रीमती जयश्री बाबर यांनी प्रथम अपिलात खाली नमूद केलेल्या मुद्दयांबाबत माहिती मागितली आहे.

" अपिलकाराचे पती हे कोल्हापूरचे युथ प्रोग्रॅम ॲडव्हायझरी कमिटीवर ॲडव्हायझर म्हणून ज्ञानदेव बाबर नावाने महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमात कोल्हापूर येथे कार्यरत आहेत. ही कमिटी जिल्हाधिकारी यांचे कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे त्यांचेकडून विचारणा करुन आयोगाने अपिलकाराचे पतीचा खरा पत्ता मिळवावा व पुढील कार्यवाही करावी व त्याच्या प्रती अपिलकारास द्याव्यात अशी मागणी आहे. " याबाबत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र महिला आयोग यांनी अपिलकाराच्या वरील मागणीबाबत अपिलकारास परस्पर माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पत्र पाठवावे व त्या पत्राची प्रत अपिलकारास द्यावी.

**आदेश**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६२/०२**

**श्री. शौकत शेखलाल शेख,** **------ अपीलकर्ता**
**मापले चाळ, हवा मंजिल समोर,**
**महागिरी, ठाणे (प.)- ४०० ६०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.शौकत शेखलाल शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ६.११.२००६ रोजी अर्ज करुन जातीचे प्रमाणपत्र मिळवून देणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १०.११.२००६ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. दि.का.खरात, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.ज.ना.राठोड, तसेच अपिलकार श्री.शौकत शेख हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

अपिलकार श्री.शौकत शेख यांनी जातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता कार्यकारी दंडाधिकारी, ता.भूम, जि. उस्मानाबाद यांचेकडे अर्ज केला होता. खाटीक जातीचे प्रमाणपत्राच्या दाव्यासंबंधी अपिलकाराने कार्यकारी दंडाधिकारी ता.भूम यांचेकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन अपिलकार श्री.शौकत शेख हे खाटीक जातीचे प्रमाणपत्र

मिळण्यास पात्र असल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे कार्यकारी दंडाधिकारी यांनी अपिलकाराचा खाटीक जातीचे प्रमाणपत्र मागणीचा दावा अमान्य केला असे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास शासन पत्र क्र.माअनि १०/२००६/प्र.क्र.३६/ मावक-५, दिनांक १७.६.२००६ व दिनांक १०.११.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने जातीचे प्रमाणपत्राकरिता कार्यकारी दंडाधिकारी, भूम, जि.उस्मानाबाद यांचेकडे अर्ज केला होता. अपिलकाराचा खाटीक जातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा दावा तपासाअंती ते खाटीक जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास पात्र नसल्याचे आढळून आल्याने जाती प्रमाणपत्र मागणीचा दावा अमान्य केला. याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि. १७.६.२००६ व दि. १०.११.२००६ च्या पत्रान्वये समर्पक उत्तर दिले असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३१/०२**

**श्री. नितीन एच.शहा,** **------ अपीलकर्ता**
**जेम्स डिमेलो चाळ, मरोळ व्हिलेज,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०५९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ईस्ट वॉर्ड,**
**गुंडावली, आझाद रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**मेंटेनन्स डिपार्टमेंट, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ईस्ट वॉर्ड, गुंडावली, आझाद रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. नितीन एच. शहा, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण), के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि. २६.२.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

"अंधेरी कुर्ला रोडच्या रुंदीकरणाचे मरोळ नाक्यापासून पाप्युलर कार बाजारापर्यंत बाधित झालेल्या बांधकामाविषयीची अनुषंगिक माहिती मागितली होती. "

अंधेरी कुर्ला रस्त्याचे रुंदीकरण हे एमएमआरडीए तर्फे करण्यात आले असल्याने याबाबतची माहिती के/ पूर्व विभागाकडे उपलब्ध नाही. आवश्यक माहिती एमएमआरडीएकडून प्राप्त करावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ३०.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी, मुंबई यांचेकडे दि.५.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३०.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, के/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी हे हजर होते. अपिलकार श्री. शहा सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अंधेरी-कुर्ला रोडच्या रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले नाही. तेव्हा अपिलकाराचा दि.२६.२.२००७ चा अर्ज जन माहिती अधिका-याने उक्त अधिनियमातील कलम ६(३) (एक) नुसार पाच दिवसाचे आत एम.एम.आर.डी.ए.कडे पाठवून तसे अपिलकारास कळविणे आवश्यक होते. परंतु, सदर प्रकरणी तशी कार्यवाही जन माहिती अधिका-यांनी केलेली नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही विहित वेळेत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३०/०२**

**श्री. प्रकाश धोंडीबा चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**त्रिवेणी सहकारी शेजार समिती,**
**वडारपाडा रोड क्र.१,**
**कांदिवली (पूर्व), मुंबई- ४०० १०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर /दक्षिण विभाग,**
**स.व प.तरण तलवाजवळ, एम.जी.छेद रस्ता क्र.२,,**
**कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (परिरक्षण),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, आर /दक्षिण विभाग,**
**स.व प.तरण तलवाजवळ, एम.जी.छेद रस्ता क्र.२,,**
**कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. प्रकाश धोंडीबा चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परिरक्षण) आर/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, कांदिवली, मुंबई यांचेकडे दि. २०.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

(१) ७२+९ अर्धे तुटलेले गाळेधारकांची पूर्ण नांवे व गाळे क्रमांक.

(२) ८ पूर्ण तुटलेले गाळे, त्याच्या गाळेधारकांची पूर्ण नावे व गाळे क्रमांक.

(३) ५७ अर्धे तुटलेले गाळेधारकांची पूर्ण नांवे व गाळे क्रमांक.

(४) १८+६+१३ पूर्ण तुटलेले गाळे, त्याच्या गाळेधारकांची पूर्ण नावे व गाळे क्रमांक.

जन माहिती अधिका-यांनी वरील एकूण चारही मुद्दयांबाबतची माहिती कार्यालयात आढळून आली नाही असे दि. १९.५.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. तसेच दुरुस्ती करण्यात आलेल्या ९ दुकानदारांची तसेच स्थलांतरित करण्यात आलेल्या ५ दुकानदारांची माहिती सदर पत्रान्वये अपिलकारास दिली. यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, आर/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, कांदिवली, मुंबई

यांचेकडे दि. २३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ७.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली व दि. २२.६.२००७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत आले.

" सहायक अभियंता (परिरक्षण) व सार्वजनिक माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास विहित वेळेत पुरविलेली आहे. अपील निकालात काढण्यांत येत आहे. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशान्वये व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १ञ९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, आर/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, कांदिवली, मुंबई, श्री. एस.आर. मुळगुंदकर हे हजर होते. अपिलकार श्री.प्रकाश चव्हाण हे सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि.२१.३.२००२ आकुर्ली रोड, हनुमाननगर, कांदिवली (पूर्व), मुंबई रोड रुंदीकरणाबाबतची चार मुद्दयांची माहिती मागितली होती. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दि. १९.५.२००७ च्या पत्रानुसार दिलेली माहिती लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२२.६.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३२/०२**

**श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर,** **------ अपीलकर्ता**
**द्वारा- महेश काशिनाथ सुर्वे,**
**८२/एफ, स्नेहा को.ऑप.हौ.सोसायटी लि.**
**मुलतानी मेन्शन, ब्लॉक नं.२, ठाकूरवाडी,**
**मुं.म.गं.मार्ग, दादर (पूर्व), मुंबई- ४०० १४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक,**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व, मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व, मुंबई-४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि. १४.३.२००७ रोजी अर्ज करुन एम-२० बॉन्डच्या प्रती तसेच एम-२० बॉन्डच्या प्रती प्राप्त झाल्यावर उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिनांक निरंकच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे माहिती दिली.

" आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितलेली माहिती ही संस्था पातळीवरील असल्याने, ती संस्थेकडून घेण्यांत यावी. तशा सूचना संस्थेला देण्यांत येत आहेत. "

दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे दि. ४.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१८.५.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली. तसेच दि. २३.५.२००७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत आले.

" अपिलकर्ता श्री. संजराज हरिश्चंद्र मंगेशकर, यांना, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती तात्काळ देण्यांत यावी. "

अपिलीय अधिका-यांनी आदेश देवून, त्या आदेशाचे पालन न केल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१, श्री.बी.के.हांडे तसेच अपिलकार श्री.मंगेशकर हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने एम-२० या बॉन्डच्या प्रती, तसेच एम-२० बॉन्डच्या प्रती प्राप्त झाल्यावर उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित मुदतीत माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२३.५.२००७ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना देवूनही जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१ यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. तरी या परिस्थितीत मीअसे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१ यांनी माहिती द्यावी. भविष्यात अशी घटना घडणार नाही याची जन माहिती अधिकारी यांनी दक्षात घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६५/०२**

**श्री. अमलदार रा.ठाकूर, ------ अपीलकर्ता**
**बी.एल.एच. रुम नं.३१९,**
**कुर्ला कदम को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई- ४०० २४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,**
**परिमंडळ -६ यांचे कार्यालय,**
**चेंबूर, मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,**
**पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई-४०० ०७१. ------- उत्तरवादी**

## - विवेचन -

अपिलकार श्री. अमलदार रा.ठाकूर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई यांच्याकडे दि.१२.१२.२००६ रोजी अर्ज करुन, अपिलकाराविरुध्द कुर्ला कदम सोसायटीचे खाकसार कमांडर अशफाक खान व प्रमादे पिसाळ तसेच इतर २०२ लोकांनी केलेल्या तक्रारीबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-६ चेंबूर, मुंबई यांच्याकडे दि. २२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर दि.२२.२.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी कागदपत्रांची पडताळणी केली असता दि.२६ व २७ जुलै, २००५ च्या अतिवृष्टीमुळे नेहरु नगर पोलीस ठाणे येथील सर्व दस्तऐवज पाण्याने भिजून खराब झाले. त्यामुळे अपिलकाराने मागितलेली माहिती पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर उपलब्ध नाही असे निदर्शनास आले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, चेंबूर, मुंबई हे हजर होते. अपिलकास सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, नेहरुनगर पोलीस ठाणे येथील सखल भाग असल्यामुळे तेथे दि.२६ जुलै,२००५ च्या अतिवृष्टीमुळे सात फूटाच्यावर पाणी साचल्यामुळे पोलीस ठाण्यातील साहित्य व कागदपत्र भिजून खराब झाली. तसेच पाणी बराच काळ साठून राहिल्यामुळे सर्व वस्तूंचे नुकसान झाले. त्याबाबत ठाणे दैनंदिनी क्र.३४/०५, दि. १.८.२००५ रोजी नोंद घेतली. सदर परिस्थिती लक्षात घेतली असता असे दिसून येते की, प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-०८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७५९/०२**

**श्री. चंद्रहास गजानन वाडीकर,** **------ अपीलकर्ता**
**१५/३, सागर सानिध्य को.ऑप.हौ.सोसायटी,**
**जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, माहीम कॉजवे रोड,**
**माहीम, मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,** **------- उत्तरवादी**
**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. चंद्रहास गजानन वाडीकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.५.४.२००७ रोजी अर्ज करुन, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांना लिहिलेल्या पत्र क्र.गवसु-१०९९/आरआर-४८३/झोपयु-१, दि. ३.६.१९९९, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण, विशेष सहाय्य विभाग यासंबंधीच्या फाईलची तपासणी करण्यास परवानगी मागितली होती. फाईलच्या वर्गीकरणानुसार " ड" वर्ग दप्तरी दाखल प्रकरणे एक वर्षानंतर नष्ट करण्यांत येतात. त्यानुसार अपिलकाराने मागितलेले प्रकरण " ड" वर्गातील असल्याने ते एक वर्षानंतर नष्ट केले. यामुळे अपिलकारास उक्त फाईल तपासण्याकरिता दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग यांचेकडे दि. ९.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. फाईल तपासणीकरिता दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, गृहनिर्माण विभाग, श्री. सि.ठ.आघाव, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, श्री.मो. गं.आरसेवाड हे हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्री.चंद्रकांत वाडीकर यांनी दि. ५.४.२००७ च्या अर्जान्वये क्र.गवसु-१०९९/आरआर-४८३/झोपयु-१, दि. ३.६.१९९९ च्या पत्रासंबंधीच्या धारिकेची तपासणी करण्याकरिता परवानगी देण्याची विनंती केली होती. त्यामधील संबंधित निवेदन, मुख्य कार्यकारी अधिकारी, झ ोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी दि. ३.६.१९९९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी पाठविले होते. सदर फाईल " ड" वर्ग दप्तरी दाखल केली होती. त्यामुळे सदर संचिका पत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वषानंतर नष्ट करण्यांत आली. त्यामुळे फाईल तपासणीची अपिलकाराची मागणी मान्य करता येत नसल्याचे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.३.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. अर्जावर प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेले उत्तर समर्पक असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. परंतु अर्जावर जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही केली नाही असे दिसते. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७३/०२**

**श्री. विजयानंद जी.बोले,** **------ अपीलकर्ता**
**५/३६, बी.एम.सी.बिल्डिंग,**
**लाला कॉलेजसमोर, मुंबई- ४०० ०३४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**महाव्यवस्थापक (पी ॲन्ड आय.आर.),**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतूक भवन, सेंट्रल ऑफीस, मुंबई-४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कर्मचारी वर्ग अधिकारी (सेमी),**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**वाहतूक भवन, सेंट्रल ऑफीस, मुंबई-४०० ००८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. विजयानंद बोले, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी (सेमी),महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,वाहतूक भवन, सेंट्रल ऑफीस, मुंबई यांच्याकडे दि. ४.५.२००७ रोजी अर्ज करुन त्यांचा स्वतःचा भविष्यनिर्वाह निधी, उपदान, पगार, महागाई भत्ता, औषधोपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती इ.पोटी राज्य परिवहन महामंडळाकडून येणे थकबाकी रक्कम मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. २८.५.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थ्ंापक (पी ॲन्ड आय.आर.) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,वाहतूक भवन, सेंट्रल ऑफीस, मुंबई, श्री.यु.एन.मोरे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिका-यांच्या वतीने श्री.विलास जाधव, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई तसेच अपिलकार श्री.विजयानंद बोले हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

अपिलकार श्री.विजयानंद बोले हे पूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांच्या सेवेत कार्यरत होते. त्यांनी सन २००४ मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सेवेचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांच्या भविष्य निर्वाह निधी व इतर देय रक्कम त्यांना देण्यात आल्या नाहीत. त्यामुळे अपिलकाराने दि.४.५.२००७ च्या अर्जान्वये एकूण १७६ मुद्दयांवर माहिती मागितली आहे. सदर मुद्यांचे अवलोकन केले असता बहुतेक मुद्यात त्यांना त्यांची देय भविष्य निर्वाह निधीची रक्कम का देण्यात आली नाही याबाबत माहिती मागितली आहे. तसेच अन्य तृतीय पक्षाची प्रश्नार्थक/ धारणात्मक (Presumptive) स्वरुपाची माहिती मागितली आहे. याबाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

" महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दि.२३.२.२००६ च्या आदेशान्वये माहिती अधिकारी, सहायक माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी पद निर्देशित केली आहेत. अपिलकाराने १७६ मुद्यांच्या सूचीतील मुद्याबाबत संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करावा. वास्तविक माहितीच्या अधिकारांतर्गत दि. १४.८.२००६ रोजी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयातील सूचितबाबत यापूर्वी संबंधित माहिती अधिकारी यांनी खुलासा अपिलकारास केला आहेच. "

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने एकूण १७६ मुद्यांबाबत मागविलेल्या माहितीमध्ये मुख्य मुद्दा अपिलकारास भविष्यनिर्वाह निधीची रक्कम अदा केलेली नाही. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली आहे. अपिलकाराच्या दि. ४.५.२००६ च्या अर्जातील इतर मुद्दयांबाबत त्यांनी संबंधित जन माहिती अधिका-याकडे संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-याने दि. २८.५.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास माहिती दिली. परंतु अपिलकारास भविष्यनिर्वाह निधीची रक्कम का अदा करण्यात आली नाही याबाबत माहिती दिली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकारास भविष्यनिर्वाह निधी अनुज्ञेय असल्यास सदर रक्कम देण्यासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/६६/०२**

**श्री. एस.पी.गोयल,** **------ तक्रारदार**
**१०३, ए, कृष्णा चेंबर,**
**५९, न्यु मरिन लाईन्स, मुंबई- ४०० ०२०.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,**
**नगर रचना विभाग, ठाणे महानगरपालिका,**
**प्रशासकीय इमारत, अलमेडा रोड, चंदनवाडी,**
**पाचपाखडी, ठाणे (प.), मुंबई- ४०० ६०१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

तक्रारदार श्री. एस.पी.गोयल यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.६.२००७ रोजी तक्रार दाखल केले. सदर तक्रारीवर दि.२.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे श्री. न.र.राणे, श्री. रमेश इनामदार, उप अभियंता, ठाणे महानगरपालिका, तसेच अपिलकाराच्या वतीने कु.योगिता चव्हाण हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच तक्रारीच्या कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी आढळून आल्या.

तक्रारदाराने दि. २४.४.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्याकडे कावेसर येथील मिळकतीबाबत महापालिकेने मंजूर केलेल्या बांधकाम प्रस्तावा विषयी एकूण सात मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने तक्रारदाराने दि. १०.८.२००६ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील फेटाळले. त्यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दि. २९.३.२००८ रोजी सुनावणी घेतली. तक्रारदाराने ठाणे महानगरपालिकेत जावून, आवश्यकता वाटल्यास महानगर पालिकेतील कागदपत्रे पाहून सत्यप्रती त्यांना त्याच दिवशी देण्यात याव्यात असे निर्देश देण्यात आले होते. मात्र काही कारणामुळे तक्रारदार

उपस्थित राहू शकले नाहीत. तरी दि. १३.४.२००८ रोजी हे कागदपत्र पोस्टाने किंवा इतर मार्गाने अर्जदाराकडे रवाना करावे असे राज्य माहिती आयोगाने निर्देश देऊन दि. २९.३.२००८ रोजी आदेश पारित केले.

राज्य माहिती आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी तक्रारदारास मागणी केलेली कागदपत्र अद्याप उपलब्ध करुन दिलेली नाहीत. माहितीपोटी तक्रारदाराने यापूर्वीच रु.३४०८/- इतक्या रकमेचा भरणा केला आहे. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य माहिती आयोगाने निदेश देवूनही जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, ठाणे यांनी तक्रारदारास अद्याप माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द उक्त नियमातील कलम २० (१) अन्वये शास्ती का लावण्यात येवू नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे प्रत्यक्ष भेटून खुलासा सादर करावा. तसेच तक्रारदारास मागणी प्रमाणे मागितलेली माहिती १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७१/०२**

**श्री. अरविंद भास्कर मेस्त्री,** **------ अपीलकर्ता**
**गणनाकृत झोपडे क्र.१५, ९/९ लकडीवाला चाळ,**
**अंतिम भूखंड क्र.२७३/७४, जवाहर पथ,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,** **------- उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ५ वा मजला,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. अरविंद भास्कर मेस्त्री, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि. ११.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील भूखंडासंबंधी अनुषंगिक पाच मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

(१) विश्वास सहकारी गृहनिर्माण संस्था या नावाने ओळखली जाणारी झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र. २७३, न.भू.क्र. ५८०९ पैकी, आर. बी. मेहता मार्ग, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०००७७.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र,२७३/२७४, न.भु.क्र. ५८०८ व ५८०९, जवाहर पथ, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दि.२५.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित

करण्यात आली. आदेश पारित केले नाहीत. परंतु जन माहिती अधिका-यांनी खालीलप्रमाणे दि. १२.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली.

**मुद्दा क्र.१ :** सदर माहिती कार्यकारी अभियांत्रिकी विभागाशी संबंधित असल्याने आपण संबंधित विभागाकडे संपर्क साधावा.

**मुद्दा क्र.२ :** उपरोक्त अंतिम भूखंड क्र.२७३, न.भू.क्र.५८०९ पैकी आर.बी.मेहता पथ, घाटकोपर- पूर्व, मुंबई-७७ या पत्त्यावरील विश्वास सहकारी गृहनिर्माण संस्थेतील बेकायदेशीररित्या गाळे कब्जा केलेल्या (किसन नामदेव ढोबळे सदनिका क्र.३०४) (माधवी श्रीधर जाधव अधिनिवासी गाळा क्र.९) व्यक्तिंना निष्कासित करण्यासाठी उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सहाय्यक आयुक्त, एन विभाग यांना पाठविलेल्या पत्राची प्रत (पृष्ठे १)

**मुद्दा क्र.३ :** उप जिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी गुमास्ता परवाना सत्य पडताळणीसाठी पाठविलेल्या पत्राची प्रत संदर्भ क्र.झोपुप्रा/ उजि/ विश्वास/ परि-२ /०७/ २६२, दि.१७.१.२००७ च्या पत्राच्या प्रती (पृष्ठे १)

**मुद्दा क्र. ४** : वरिष्ठ निरीक्षक दुकाने आणि आस्थापना यांनी पाठविलेल्या त्यांच्या कार्यालयाकडील संदर्भ क्र. अे.सी.एन. / १०१, दि. २८.२.२००७ अनक उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना पाठविलेल्या पत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रमाणित नक्कल प्रत (पृष्ठे २ )

**मुद्दा क्र. ५ :** सहाय्यक आयुक्त एन विभाग यांचेकडील दि. ७.३.२००७ च्या पत्रावर कार्यवाही सुरु असून अंतिम कार्यवाहीनंतर आपणांस याबाबत कळविण्यात येईल.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधी उलटून गेल्यानंतर अपूर्ण माहिती दिली. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता सहायक माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, श्री.दशरथ पोपट मोरे, तसेच अपिलकार श्री.अरविंद मेस्त्री हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

अपिलकाराने विश्वास सहकारी गृहनिर्माण संस्था या नावाने ओळखली जाणारी झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र.२७३, न.भु.क्र.५८०९ पैकी, आर.बी.मेहता मार्ग, घाटकोपर (पूर्व) आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजना, अंतिम भूखंड क्र.२७३/ २७४ न.भु.क्र.५८०८ व ५८०९ जवाहर पथ, घाटकोपर (पूर्व) बाबत

पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. १२.६.२००७ च्या पत्रान्वये मुद्दा क्र. २,३ व ४ बाबतच्या माहितीपोटी आवश्यक शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलकारास कळविले. मुद्दा क्र.१ बाबत कार्यकारी अभियांत्रिकी विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाकडे संपर्क साधण्याबाबत व मुद्दा क्र. ५ संबंधी अंतिम कार्यवाही नंतर कळविण्यांत येईल असे अपिलकारास कळविले.

सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे ८१ झोपडपट्टीधारकांपैकी ६७ झोपडपट्टीधारकांची संमती ही उप जिल्हाधिकारी (झोपुप्रा) यांचे कार्यालयातील अभिलेखानुसार आहे. त्यामुळे सदर संमतीबाबतचा अभिलेख उप जिल्हाधिकारी (झोपुप्रा) यांचे कार्यालयाकडून उपलब्ध करुन घ्यावा असे प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी कक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अपिलकारास दि. २०.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराच्या दि. ११.४.२००७ च्या अर्जातील मुद्दा क्र.२, ३, व ४ बाबतची माहिती शुल्क कार्यालयात भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत जन माहिती अधिका-याने अपिलकारास कळविले होते. यावरुन सदर माहिती अपिलकारास प्राप्त झाली किंवा कसे याची अपिलातील कागदपत्रावरुन खातरजमा होत नाही. परंतु मुद्दा क्र. १ व ५ बाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिलेली नाही. मुद्दा क्र.१ च्या माहितीबाबत टोलवाटोलवी केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांची ही कृती निश्चितच शोभनीय नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्या पासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारा तील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४५८/०२**

**श्री. एस.एम.मुशर्रफ शम्सी, ------ अपीलकर्ता**
**बी-३, मीरापार्क, गीतानगर,**
**मीरा-भाईंदर रोड, जुन्या पेट्रोल पंपाच्या मागे,**
**मीरा रोड (पूर्व), जि.ठाणे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सहाय्यक महानगरपालिका आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**भायखळा, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (मेंटेनन्स),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई वॉर्ड,**
**भायखळा, मुंबई.**

## - <u>विवेचन</u> -

अपिलकार श्री. एस.एम. मुशर्रफ शम्सी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६(१)अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा यांचेकडे दि.२७.१२.२००६ रोजी अर्ज करुन सन २००४ ते २००७ या कालावधीची खालील माहिती मागितली होती.

(१) सन २००४-२००५ आणि २००५-२००६ या अर्थसंकल्पीय वर्षात, नगरसेवक सर्वश्री आयुब अंसारी, आयुर शाहिद आजझी, रज्जाक काजी आणि सुरेश काळे यांच्या वॉर्डात नगरसेवक फंडातून कोणकोणती कामे करण्यात आली याबाबत बाबनिहाय माहिती.

(२) वरील चारही नगरसेवकांच्या वॉर्डात सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात नगरसेवक फंडातून कोणकोणती कामे करण्यात आली याबाबत बाबनिहाय माहिती.

(३) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात वरील चारही नगरसेवकांच्या वॉर्डात कोणकोणती कामे चालू आहेत, याबाबत बाबनिहाय माहिती.

(४) नगरसेवक श्री.आयुब अंसारी यांच्या वॉर्डात पाणी पाईप लाईन बदलण्याचे काम केले किंवा काम चालू आहे, हे कोणत्या फंडातून करण्यात येत आहे, याबाबतचा प्रस्ताव केव्हा मंजुर झाला, सदर प्रस्ताव मंजूर करणा-या अधिकारी/ कर्मचा-यांची काय भूमिका होती, सदर प्रसताव किती रकमेचा आहे.

जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई यांचेकडे दि.७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित करण्यात आली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, श्री.प्रकाश पाटील, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, ई विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, श्री.एस.जी.गरुडे, तसेच अपिलकार श्री.एम.एस.मुशर्रफ शम्सी हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत काहीही कार्यवाही केली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या प्रकरणी अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता मोठया प्रमाणात माहिती मागितली आहे. तेव्हा अपिलकारास हवी असलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपिलकारास संबंधित फाईलची तपासणी करण्यास परवानगी द्यावी. अपिलकाराने कार्यालयात जावून सर्व संबंधित फाईलची तपासणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास आवश्यक माहिती ३० दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती देण्याची जन माहिती अधिका-यांनी दक्षता घ्यावी. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयंतांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७६८/०२**

**श्री. विजय कोंडया मंथेना, ------ अपीलकर्ता**
**हरियानावाला लेन, अब्दुला मेन्शन इमारत क्र.७,**
**रुम नं.३४, स्टेशन रोड,**
**कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता इ.प्र.च.(३),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**भाभा हॉस्पिटल बिल्डिंग, १ ला मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**भाभा हॉस्पिटल बिल्डिंग, १ ला मजला,**
**आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**महापालिका वास्तुशास्त्रज्ञ,**
**महापालिका मुख्य कार्यालय,**
**५ वा मजला, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. विजय कोंडया मंथेना, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका याचेकडे दि.१६.१०.२००६ रोजी अर्ज करुन, बी.एस.ई.एस.रुग्णालय, अंधेरी (प.), एस.व्ही.रोडच्या संचालकांनी रुग्णालयाच्या इमारतीच्या मूळ आराखडयात बदल केलेल्या अनधिगृत बांधकामाबद्दल केलेल्या तक्रारीसंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इमारती प्रस्ताव) वांद्रे (प.) मुंबई यांचेकडे दि. २६.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास खालील प्रमाणे दि. १७.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली.

" अपिलकाराने विचारणा केलेल्या माहितीचे सार्वजनिक माहिती अधिकारी, महापालिका वास्तुशास्त्रज्ञ असून, त्यांचे वरिष्ठ अधिकारी अधिकृत अपील अधिकारी आहेत. अपिलकाराने संबंधित अपिलीय अधिका-याकडे आपला अर्ज सादर करावा. "

यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, मुंबई तसेच अपिलकार श्री.विजय मंथेना हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (३) (एक) (दोन) अनुसार ज्या माहितीचा विषय अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित असेल त्याबाबतीत, ज्याच्याकडे असा अर्ज करण्यात आला आहे ते सार्वजनिक प्राधिकरण, असा अर्ज अन्य सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करील, अशा हस्तांतरणाबाबत अर्जदारास तात्काळ माहिती देईल अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार अपिलकाराचा माहितीच्या अधिकारातील दि. १६.१०.२००६ चा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबंधित प्राधिकरणा कडे पाठवून अपिलकारास कळविणे आवश्यक होते. परंतु सदर तरतुदीनुसार या प्रकरणी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही विहित वेळेत केलेली नाही. सदर जन माहिती अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

या प्रकरणी मी असे आदेश देतो की,अपिलकाराचा दि.१६.१०.२००६ चा माहितीच्या अधिकारातील अर्ज महापालिका वास्तुशास्त्रज्ञ, महापालिका मुख्य कार्यालय, ५ वा मजला, मुंबई यांचेकडे तात्काळ सादर करावा. महापालिका वास्तुशास्त्रज्ञ यांनी अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासूप ३० दिवसांचे आंत माहिती द्यावी.

## आदेश

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४५७/०२**

**श्री. एम. एस. शेख,** **------ अपीलकर्ता**
**ए-१, ७०२, धर्ती कॉम्प्लेक्स,**
**एव्हरशाईन नगर, मीरा रोड, जि.ठाणे.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक,** **------ उत्तरवादी**
**आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,**
**सी.एस.टी. मुंबई-४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. एम. एस. शेख, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्याकडे दि. ९.१.२००७ रोजी अर्ज करुन मुर्तूजापूर उप जिल्हा रुग्णालयाचे महालेखाकार कार्यालयाच्या नियंत्रण पथकाने दि. १६.८.२००५ ते २४.८.२००५ या कालावधीत ताळमेळचे काम केले. सदर संपूर्ण ताळमेळ अहवालाची प्रत मागितली आहे. ताळमेळ पथक कोणाच्या नियंत्रणाखली येते. ताळमेळ पथकाच्या दुर्लक्षामुळे कोटयावधी रुपयोंचा भ्रष्टाचार झाल्याचे समजते. या भ्रष्टाचारास जबाबदार कोण, ताळमेळ करण्याची जबाबदारी उप संचालकांची असेल तर नियमाची प्रत द्यावी. नियंत्रण पथकाने तफावती कोणाला कळविल्या पाहिजे इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (वैद्यकीय), आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे दि. २२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत आदेश पारित केले नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, आरोग्य सेवा, डॉ.एन.जे.राठोड, डॉ. एन. के. पाटील, सह संचालक, आरोग्य सेवा, जन माहिती अधिकारी, श्री. हि.ल.पवार हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, मुर्तूजापूर, उप जिल्हा रुग्णालयातील लेखा परिक्षणा संदर्भात संबंधित पोलीस ठाण्यामध्ये प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला असून, तपास चालू असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीचा विचार करता अपिलकाराने मागितलेली माहिती देता येत नाही असे सह संचालक, आरोग्य सेवा (आरोग्य), पुणे यांनी दि. ७.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. तसेच राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून मुर्तूजापूर उप जिल्हा रुग्णालयातील ताळमेळासंबंधी चौकशी करण्यात येत असल्यामुळे संबंधित दस्तऐवज सील करण्यात आले असल्यामुळे सद्य:स्थितीत अपिलकाराने मागितलेली माहिती देता येत नाही असे दि. २३.२.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. सह संचालक आरोग्य सेवा (आरोग्य), पुणे यांनी वरील पत्रान्वये अपिलकारास दिलेले उत्तर वस्तुनिष्ठ असल्यामुळे अपील अर्जावर वेगळयाने निर्णय देण्याची आवश्यकता नसल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय) यांनी अपिलकारास प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कळविले. यावरुन अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत पोलीस खात्याकडून चौकशी चालू असल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वेळोवेळी कळविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास समर्पक उत्तर दिले असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६८/०२**

**श्री. दिपक राजाराम जगताप, ------ अपीलकर्ता**
**ए-२, शबरी को. ऑप. हौसिंग सोसायटी,**
**परेरावाडी, साकीनाका, मुंबई- ७१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, ------ उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा भूव्यवस्थापक,**
**भूशाखा (कुर्ला विभाग), मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. दिपक राजाराम जगताप, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा भूव्यवस्थापक, भूशाखा, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, म्हाडा, मुंबई यांच्याकडे दि.१७.१०.२००६ रोजी अर्ज करुन कन्नमवार नगर नं.२, विक्रोळी येथील प्लॉट क्र.२, इमारत क्र.६४ च्या समोरील प्लॉट संबंधीची माहिती मागितली होती. सदर प्लॉट सध्या ओनरशीप करण्यात आला आहे का, असल्यास केव्हापासून आणि कोणाच्या नावे करण्यात आला, सदर प्लॉट आतापर्यंत कोणकोणत्या व्यक्तिंच्या नांवे हस्तांतरित करण्यात आला होता त्या संबंधित व्यक्तिंची नावे, तारखा. या प्लॉटसंबंधी मुंबई मंडळाकडे मासिक अथवा वार्षिक अथवा एकरकमी काही रक्कम भरण्यात आली आहे का, काही थकबाकी आहे का, म्हाडाकडून प्लॉट हस्तांतरित करण्यांत आला आहे का, असल्यास त्यासंबंधीची कागदपत्र इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर विषय मिळकत व्यवस्थापक (३) मुंबई मंडळ यांच्याशी संबंधित असल्याचे नमूद करुन, कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ यांनी दि. २०.१०.२००६ च्या पत्रान्वये मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी माहितीचा अर्ज पाठविण्यात आला.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. ७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची पडताळणी करण्यांत आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि.१७.१०.२००६ रोजी अर्ज करुन कन्नमवारनगर क्र.२, विक्रोळी येथील प्लॉट क्र.२ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा संबंध मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांच्याशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अर्ज त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी दि. २०.१०.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. परंतु मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांनी या प्रकरणी त्यांचा संबंध नसल्याने अपिलकाराचा अर्ज सहाय्यक भू शाखा मुंबई मंडळ, मुंबई यांच्याकडे दि. १८.१२.२००६ च्या पत्रान्वये पाठवून तसे अपिलकारास कळविले. त्यानंतर सहायक भू व्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ, मुंबई यांनी अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा संबंध मिळकत व्यवस्थापक क्र.(३) मुंबई मंडळ यांच्याशीच असल्याचे नमूद करुन अपिलकारास दि. ११.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यावरुन अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी मिळकत व्यवस्थापक (३), सहायक भू व्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ, कार्यकारी अभियंता/ घावि यांच्यामध्ये टोलवाटोलवी करण्यांत येत आहे असे दिसून येते. या परिस्थितीत मी प्रथम अपिलिय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांना असे आदेश देत आहे की, हे आदेश पारित झाल्यापासून अपिलकारास ३० दिवसांचे आंत मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४७३/०२**

**श्री. दिपक राजाराम जगताप,** **------ अपीलकर्ता**
**ए-२, शबरी को. ऑप. हौसिंग सोसायटी,**
**परेरावाडी, साकीनाका, मुंबई- ७१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,** **------ उत्तरवादी**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा भूव्यवस्थापक,**
**भूशाखा (कुर्ला विभाग), मुंबई मंडळ,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## - **वि वे च न** -

अपिलकार श्री. दिपक राजाराम जगताप, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा भूव्यवस्थापक, भूशाखा, कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, म्हाडा, मुंबई यांच्याकडे दि.१७.१०.२००६ रोजी अर्ज करुन कन्नमवार नगर नं.२, विक्रोळी येथील प्लॉट क्र.२, इमारत क्र.६४ च्या समोरील प्लॉट संबंधीची माहिती मागितली होती. सदर प्लॉट सध्या ओनरशीप करण्यात आला आहे का, असल्यास केव्हापासून आणि कोणाच्या नावे करण्यात आला, सदर प्लॉट आतापर्यंत कोणकोणत्या व्यक्तिंच्या नांवे हस्तांतरित करण्यात आला होता त्या संबंधित व्यक्तिंची नावे, तारखा. या प्लॉटसंबंधी मुंबई मंडळाकडे मासिक अथवा वार्षिक अथवा एकरकमी काही रक्कम भरण्यात आली आहे का, काही थकबाकी आहे का, म्हाडाकडून प्लॉट हस्तांतरित करण्यांत आला आहे का, असल्यास त्यासंबंधीची कागदपत्र इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. सदर विषय मिळकत व्यवस्थापक (३) मुंबई मंडळ यांच्याशी संबंधित असल्याचे नमूद करुन, कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ यांनी दि. २०.१०.२००६ च्या पत्रान्वये मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी माहितीचा अर्ज पाठविण्यात आला.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. ७.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.९.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची पडताळणी करण्यांत आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात दि.१७.१०.२००६ रोजी अर्ज करुन कन्नमवारनगर क्र.२, विक्रोळी येथील प्लॉट क्र.२ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा संबंध मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांच्याशी संबंधित असल्याने अपिलकाराचा अर्ज त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी दि. २०.१०.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. परंतु मिळकत व्यवस्थापक (३), मुंबई मंडळ यांनी या प्रकरणी त्यांचा संबंध नसल्याने अपिलकाराचा अर्ज सहाय्यक भू शाखा मुंबई मंडळ, मुंबई यांच्याकडे दि. १८.१२.२००६ च्या पत्रान्वये पाठवून तसे अपिलकारास कळविले. त्यानंतर सहायक भू व्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ, मुंबई यांनी अपिलकाराने मागितलेल्या माहितीचा संबंध मिळकत व्यवस्थापक क्र.(३) मुंबई मंडळ यांच्याशीच असल्याचे नमूद करुन अपिलकारास दि. ११.१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यावरुन अपिलकाराने मागितलेल्या माहितीसंबंधी मिळकत व्यवस्थापक (३), सहायक भू व्यवस्थापक, कुर्ला मुंबई मंडळ, कार्यकारी अभियंता/ घावि यांच्यामध्ये टोलवाटोलवी करण्यांत येत आहे असे दिसून येते. या परिस्थितीत मी प्रथम अपिलिय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई यांना असे आदेश देत आहे की, हे आदेश पारित झाल्यापासून अपिलकारास ३० दिवसांचे आंत मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६७/०२**

**श्री. वामन विष्णू चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**७६/ई, लोकोत्कर्ष वाचनालय, भवानी गेट,**
**मंगल सोसायटी जवळ, र.अ.किडवाई रोड,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**उप मुख्य अभियंता वाणिज्य उत्तर,**
**उत्तर विभाग, बेस्ट भवन, २ रा मजला,**
**परिवहन अभियांत्रिकी इमारत,टिळक रोड,**
**दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वाणिज्य,**
**उत्तर विभाग, बेस्ट भवन, २ रा मजला,**
**परिवहन अभियांत्रिकी इमारत,टिळक रोड,**
**दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. वामन विष्णू चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वाणिज्य उत्तर विभाग, बेस्ट उपक्रम परिवहन अभियांत्रिकी इमारत, दादर, मुंबई यांच्याकडे दि. १३.९.२००६ रोजी अर्ज करुन विद्युत मीटर तीन केबिनला महानगरपालिका फ/ उत्तर विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची नक्कल मिळण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१३.१०.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

" विद्युत मीटर केबिनला महानगरपालिका फ/उत्तर विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची (NOC) नक्कल प्रत खूप शोध घेतल्यानंतरही दप्तरी उपलब्ध होत नाही. "

जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, ग्राहक सेवा (उत्तर) विभाग, बेस्ट उपक्रम परिवहन अभियांत्रिकी इमारत, दादर, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. अपिलकारास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता काही कालावधी लागेल.

यास्तव १५ दिवसांचा जास्त कालावधी योग्य ठरेल असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २८.११.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारा कळविले. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. २८.१२.२००६ च्या पत्रान्वये असे कळविले की, " ही बाब जुनी असल्याकारणाने त्याबाबत अभिलेख उपलब्ध नाही. " अपिलकाराने अर्जात उल्लेख केलेल्या तीन केबिनच्या फक्त यंत्रणा व संधारणा क्रमांकाची यादी अपिलकारास उपलब्ध करुन दिली व अपिलकाराचा अर्ज निकाली काढण्यात आला.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, ग्राहक सेवा (उत्तर) विभाग, बेस्ट उपक्रम, तसेच अपिलकार श्री. वामन चव्हाण हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची पडताळणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने विद्युत मीटर तीन केबिनला महानगर पालिका एफ/उत्तर विभागाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. शोध घेऊनही ना हरकत प्रमाणपत्र दप्तरी उपलब्ध होत नाही. त्याबाबतचे अभिलेख उपलब्ध नाही. फक्त यंत्रणा ा व संधारणा क्रमांकाची यादी अपिलकारास देण्यात आली. यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती फार जुनी असल्यामुळे व अभिलेख उपलब्ध नसल्याने जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देता येत नसल्याने अपिलकारास वेळोवेळी कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, पुन्हा या प्रकरणी जाणिवपूर्वक शोध घ्यावा व कागदपत्र उपलब्ध झाल्यास अपिलकारास आवयश्यक ती माहिती द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७६५/०२**

**श्री. रमेश मुन्नीलाल कलवार,** **------ अपीलकर्ता**
**जनसंघर्ष सेवा समिती (s),**
**विरचंद मारवाडी चाळ, रुम नं.३,**
**मेहबूब बेकरी समोर, सोमवार बाजार,**
**मालाड (प.) मुंबई- ४०० ०६४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**डी.एम.सी.IV, मनपा तरण तलावाजवळ,**
**महात्मा गांधी क्रॉस रोड,**
**कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,**
**व्ही.टी.स्टेशनसमोर, मुंबई.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. रमेश मुन्नीलाल कलवार, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी तथा महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस यांच्याकडे दि.२७.४.२००७ रोजी अर्ज करुन आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.३.२००७ रोजी झालेल्या जनता दरबारात सादर केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत, महानगरपालिका आयुक्तांनी त्यावर केलेल्या टिप्पणीची छायांकित प्रत प्रमाणित करुन देण्याबाबत मागणी केली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकातर्फे माहितीचा अधिकारी, २००५, कलम ५ (१) नुसार सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग यांना जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. म्हणून अपिलकाराचा अर्ज सहायक आयुक्त पी/उत्तर विभाग महानगरपालिका इमारत, लिबर्टी गार्डन, मामलेतदार वाडी, मालाड यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला असल्याचे अर्जदारास दि.९.५.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले.

विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, डीएमसी IV, मनपा तरण तलावाजवळ महात्मा गांधी क्रॉस रोड, कांदिवली, मुंबई यांच्याकडे दि. १५.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे

व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, महानगरपालिका आयुक्तांनी दि. १५.३.२००७ रोजी जनता दरबार आयोजित केला होता. त्यावेळी अपिलकाराने टोकन क्र.२२ प्रमाणे सदर जनता दरबारामध्ये निवेदन सादर केले. सदर निवेदनावर कार्यवाही करुन अपिलकारास त्याबाबत लवकरच कळविण्यात येईल अशी त्याच दिवशी लेखी पोच देण्यात आली. महापालिका आयुक्तांच्या स्वीय चिटणीसांच्या दि. ९.५.२००७ च्या पत्रास अनुसरुन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी श्री.विक्रम पवार, डीएमसी IV, कांदिवली, मुंबई यांच्याकडे अपील अर्ज दि.१५.६.२००७ रोजी दाखल केला. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. ही बाब निश्चित योग्य नाही. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, अपिलकार श्री. रमेश कलवार यांनी दि. १५.३.२००७ रोजी महानगरपालिका आयुक्त यांनी आयोजित केलेल्या जनता दरबारामध्ये सादर केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-११/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४६०/०२**

**श्रीमती चैल्लम वैद्यनाथन,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.२०१, जमुना के रहेजा रेसिडेंशियल कॉम्प्लेक्स,**
**पाईपलाईन रोड, बाळकुम,**
**ठाणे (प.) मुंबई- ४०० ६०८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी,**
**जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,**
**जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग,**
**फोर्ट, मुंबई-४०० ०२३.**

## - विवेचन -

अपिलकार श्रीमती चैल्लम वैद्यनाथन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई यांच्याकडे दि.१६.१२.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकाराने त्यांचा दस्त क्रमांक पीबबम-२२२/९१, हा सोळा वर्षा पूर्वी नोंदणीसाठी दाखल केला असून, अद्यापपर्यंत त्याची नोंदणी पूर्ण होऊन परत मिळाला नसल्याने सदर दस्ताच्या सद्यःस्थितीबाबत विचारणा केली होती. दस्त क्र. पीबबम-२२२/९१, हा सहायक संचालक, नगररचना (मुद्रांक व मूल्यांकन), ठाणे यांच्या मूल्यांकन अहवालानुसार कलम ३२ (अ) खालील कार्यवाही पूर्ण करुन दि. १०.१.२००७ रोजी नोंदणी पूर्ण करण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. तसेच कार्यालयीन वेळेत दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी मुंबई शहर, मुंबई, जावक विभाग, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे हजर राहून स्वतः किंवा प्राधिकार पत्र दिलेल्या व्यक्तिसोबत मूळ नोंदणी पावतीसह पाठविल्यास दस्त उपलब्ध करुन देण्यात येईल असेही जन माहिती अधिका-यानी अपलकारास कळविले होते. यापूर्वीच अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई जिल्हा यांच्याकडे दि. १७.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि.९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई जिल्हा, श्री. व्ही.एस.सातदिवे, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, मुंबई शहर श्री. यु.डी. वळवी हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकारचा दस्त क्र.पीबबम-२२२/९१ हा दि. २०.५.१९९१ रोजी दुय्यम निबंधक, मुंबई जिल्हा या कार्यालयात नोंदणीसाठी सादर केला होता. सदर दस्तास नोंदणी पूर्ण करण्यासाठी १५ वर्षे का लागली याबाबतची कारणे अपिलकारास हवी आहेत. ती जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, मुंबई जिल्हा यांनी सुनावणीचेवेळी अपिलकारास दिली. दस्ताची नोंदणी दि. १०.१.२००७ रोजी पूर्ण झाल्यानंतर दि. ६.२.२००७ रोजी मूळ दस्त पक्षकाराचे मुखत्यार श्री.व्यंकट सुब्रमण्यम यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी परत केला. यावरुन अपिलकारास हवी असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४७२/०२**

**श्री. रमेश देवजी कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**११/१३, वालचंद हिराचंद मार्ग,**
**रुम नं.१, पहिला मजला,**
**दिलखुश रेस्टारंटच्या वरती,**
**बॅलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ०३८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,** **------ उत्तरवादी**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**म्हाडा, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी,**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,**
**म्हाडा, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. रमेश देवजी कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांच्याकडे दि. ७.९.२००६ रोजी अर्ज करुन श्री.देवजी वि.कांबळे, सौ.राजश्री देवजी कांबळे यांचे झोपडी बद्दल पर्यायी घर देऊन/ पुनर्रचना करुन पुनर्वसन करण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. २६.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता युपीसीने पत्र पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची पडताळणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रतिक्षानगर, सायन (पूर्व), मुंबई येथे सन १९७९ पासून अपिलकार त्यांच्या पत्नी समवेत रहात आहेत. झोपडीधारकाची ओळखपत्र सर्वेक्षण २००० योजने अंतर्गत सर्वेक्षण/ झोपडी गणना झाली. अपिलकाराची झोपडी दि. १.१.१९९५ पूर्वीची असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या दि. १४.५.१९९८ च्या शासन निर्णयानुसार संरक्षण व पुनर्वसनास पात्र आहे. म्हाडाने सन २००२ मध्ये प्रतिक्षानगर, सायन येथील प्राधिकरणाच्या जागेवर जुन्या चाळी तोडून विकासकामार्फत पुनर्वसन करण्यास सुरुवात केली. अपिलकाराची झोपडी सदर जागेत असल्यामुळे दि. ३.७.२००२ रोजी प्राधिकरणाच्या संबंधित अधिका-याकडे झोपडीबद्दल पर्यायी घर/ गाळा देवून पुनर्वसन करण्याबाबत अर्ज केला होता. परंतु, प्राधिकरणाने दि. १२.१२.२००२ रोजी प्रकरण न्यायप्रविष्ठ असतानाही झोपडी तोडली. पर्यायी जागा दिली नाही. घरातील सर्व सामान म्हाडाने जप्त केले. उप जिल्हाधिकारी, झो. पु.प्रा. म्हाडा यांचे सही शिक्क्यानिधी पत्र झोपडीधारक म्हणून प्रदान करण्यात आले आहे. (क्रमांक १७ डीएचएसएन ०००५८४) तोडलेल्या झोपडीबद्दल पर्यायी घर देवून/ पुनर्बांधणी करुन पुनर्वसन करण्याबाबत अपिलकाराने दि.१४.७.२००५ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांकडे विनंती अर्ज केला होता. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलकाराने मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील सर्व अर्जांवर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८१/०२**

**श्री. गजानन श्रीकृष्ण काळे,** **------ अपीलकर्ता**
**२३, फ्लॅट एच वन,**
**बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,** **------- उत्तरवादी**
**एम. डी. महाविद्यलाय, परेल, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**एम. डी. महाविद्यलाय, परेल, मुंबई.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. गजानन श्रीकृष्ण काळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी एम.डी.महाविद्यालय, परळ, मुंबई यांचेकडे दि.१५.१.२००७ रोजी अर्ज करुन सन २००० ते २००६ पर्यंतची खालील माहिती मागितली होती.

(१) शासनाच्या नियमानुसार एम.डी.महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत जातीच्या वर्गवारी नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, त्याची विद्यार्थ्यांच्या नावानिशी टक्केवारीनुसार माहिती.

(२) १३, १४ व १५ वी पर्यंतच्या तिन्ही शाखेती विद्यार्थ्यांचे (Library Deposite, Laboratary Deposite] Coution Money) किती गोळा करण्यांत आले. किती विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करण्यांत आली व किती रक्कम महाविद्यालयाकडे शिल्लक आहे.

(३) ११ वी व १२ वी च्या तिन्ही शाखेतील प्रत्येक मुलीकडून दरवर्षी किती शुल्क आकारण्यांत आले, एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(४) महाविद्यालयाने किती देणगी स्वीकारली व कोणाकडून स्वीकारली.

(५) शासनाकडून महाविद्यालयाला किती अनुदान दरवर्षी मिळाले व किती मिळण्याचे शिल्लक आहे.

(६) व्यवस्थापक कोटयातून ११ वी व १३ वी च्या तिन्ही शाखेत किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

(७) ११ वी ते १५ वी पर्यंत तिन्ही शाखेतील किती मागासवर्गीय (SC/ST/OBC/VJNT) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली, त्याची रक्कम, विद्यार्थ्यांचे नांव व पत्ते.

(८) १३ वी ते १५ वी मधील तिन्ही शाखेतील प्रत्येक मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक वर्षी किती शुल्क आकारण्यात आले. दरवर्षी एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(९) शासनाच्या आरक्षण धोरणानुसार एम.डी. महाविद्यालयात मागासवर्गीय प्राध्यापकांच्या किती जागा आहेत व किती जागा भरण्यांत आल्या आहेत. किती जागा सन २००६ पर्यंत भरण्याच्या बाकी आहेत.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एम.डी. महाविद्यालय, परळ, मुंबई यांचेकडे दि.१५.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एम.डी.महाविद्यालय, परेल, मुंबई, डॉ.एल.आर.तिवारी तसेच अपिलकार श्री.गजानन काळे हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने एम.डी.महाविद्यालयातील कला. वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेतील विद्यार्थी/ विद्यार्थिनींसंबंधीची सन २००० ते २००६ या कालावधीची एकूण ९ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी, एम.डी.महाविद्यालय, परेल, मुंबई, यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. ही कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दयावी. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने त्यांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) अन्वये शास्ती कां लावू नये, याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत समक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४५९/०२**

**श्री. शिवदास महादेव कोरपे,** **------ अपीलकर्ता**
**जवाहर कॉलनी, नवी पेठ,**
**मु.पो. महाड, जि. रायगड.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,** **------ उत्तरवादी**
**कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. शिवदास महादेव कोरपे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.३०.१०.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांनी औद्योगिक न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय तसेच शासनाचे आदेशाचे उल्लंघन करुन दूध संकलन पर्यवेक्षक, महाड, श्री.शिवदास कोरपे यांचेवर अन्याय केला. त्यामुळे अपिलकाराचे आस्थापनेवरील पद, वेतनश्रेणी, १२ वर्षाची वरिष्ठ श्रेणी, निवृत्तीवेतन इ. मध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले. न्यायालय/ शासनाच्या आदेशाचा अवमान केल्याबद्दल असलेली कार्यवाहीची तरतूद अपिलकाराच्या निदर्शनास आणण्यासाठी, अपिलकारावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. १८.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर पहिल्यावेळेस दि.९.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी तथा

कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई, श्री.वि.अ.धोत्रे हजर होते. अपिलकार श्री.शिवदास कोरपे हजर नव्हते. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन दि. ९.९.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली. यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवैही अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार श्री. शिवदास कोरपे हे महाड येथील दूध संकलन केंद्रात तात्पुरत्या स्वरुपात दि. १६ मार्च, १९८१ पासून कार्यरत आहेत. खोपोली व महाड येथील एकूण २८ कामगारांनी २४० दिवस सेवा पूर्ण झालेल्या दिनांकापासून नियमित आस्थापनेवर घेऊन देय आर्थिक फायदे मिळावेत म्हणून औद्योगिक न्यायालयात सन १९८९-९० मध्ये मागणी केली होती. सदर कामगारांची औद्योगिक न्यायालयाने मागणी मान्य केली. तसेच सदर कामगारांना सेवेत कायम करुन वेतन व इतर सर्व फायदे देण्यात यावेत असे दि.३१.७.१९९६ रोजी आदेश दिले होते. औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार कृषि व पदुम विभागाने दि.५.११.१९९७ रोजी आदेश निर्गमित करुन एकूण २८ कर्मचा-यांच्या सेवा नियमित करुन आर्थिक लाभ देण्याबाबत आदेश पारित केले. परंतु अपिलकारास आस्थापनेवर दूध संकलन पर्यवेक्षक म्हणून घेऊन त्या पदाची वेतनश्रेणी दिली नाही. १२ वर्षाच्या कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिला नाही. सदर सेवेचे आर्थिक लाभ केव्हा देणार याबाबत अपिलकाराने माहिती मागितली आहे. याबाबत अपिलकारास माहिती दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी द्यावी. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित वेळेत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यांत येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४७०/०२**

**श्रीमती रत्नाबाई बळवंत कोडग,** **------ अपीलकर्ता**
**१०२, निलांबरी को.ऑप.हौसिंग सांसायटी,**
**राजेंद्रगुरु नगर, नेरळ,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव,** **------ उत्तरवादी**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,(माशि-२),**
**चौथा मजला, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,(माशि-२),**
**चौथा मजला, महाराष्ट्र शासन,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

## - विवेचन -

अपिलकार श्रीमती रत्नाबाई बळवंत कोडग, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडे दि.१७.११.२००६ रोजी अर्ज करुन महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागात कार्यरत असणा-या शिक्षकीय पदाच्या सेवेबाबत अनुक्रमे पदांचा गोषवारा, सेवाशर्ती, सेवाप्रवेश नियम, हंगामी सेवा नियमित करणे इ. अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.११.१२.२००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलकाराने मागितलेल्या माहितीपैकी उच्च शिक्षण संचालनालय, सा.प्र.वि., विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेशी संबंधित मुद्दयांची माहिती अपिलकारास परस्पर देणेबाबत अपिलकाराचा अर्ज पाठवून कळविले. तसेच याबाबत अर्जदारास अवगत केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेकडे दि. २२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. ४.१.२००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

" अपिलकाराने दि. १७.११.२००६ च्या अर्जान्वये विचारणा केलेल्या माहितीबाबत, संबंधित माहिती अधिकारी यांनी दि. ११.१२.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. अपिलकारास पुन्हा माहितीसाठी दि. ११.१२.२००६ च्या पत्राची प्रत पाठविली. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ७.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही जन माहिती अधिर्क्झीरी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. त्यामुळे सुनावणी Adjourned करण्यात येऊन या प्रकरणी सुनावणी दि. ९.९.२००८ रोजी आयोजित केली. परंतु यादिवशीही सुनावणकरिता कोणीही हजर राहिले नाहीत.

सुनावणीचेवेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता अर्जावर जन माहिती अधिका-यांनी मुद्देनिहाय माहिती दिली असून, नियमानुसार कार्यवाही केली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अपिलकार दि. ७.७.२००८ व दि. ९.९.२००८ या दोन्ही दिवशी सुनावणीसाठी हजर नव्हत्या. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७९/०२**

**श्री. गजानन श्रीकृष्ण काळे,** **------ अपीलकर्ता**
**२३, फ्लॅट एच वन,**
**बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,** **------- उत्तरवादी**
**पोद्दार महाविद्यलाय, माटुंगा, मुंबई-४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**पोद्दार महाविद्यलाय, माटुंगा, मुंबई-४०० ०१९.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गजानन श्रीकृष्ण काळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी, पोद्दार महाविद्यालय, माटुंगा, मुंबई यांचेकडे दि.१७.१.२००७ रोजी अर्ज करुन सन २००० ते २००६ पर्यंतची खालील माहिती मागितली होती.

(१) शासनाच्या नियमानुसार पोद्दार महाविद्यालयात ११ व १३ वी च्या वर्गासाठी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेत जातीच्या वर्गवारी नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, त्याची विद्यार्थ्यांच्या नावानिशी टक्केवारीनुसार माहिती.

(२) १३, १४ व १५ वी पर्यंतच्या तिन्ही शाखेती विद्यार्थ्यांचे (Library Deposite, Laboratary Deposite] Coution Money) किती गोळा करण्यांत आले. किती विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करण्यांत आली व किती रक्कम महाविद्यालयाकडे शिल्लक आहे.

(३) ११ वी व १२ वी च्या तिन्ही शाखेतील प्रत्येक मुलीकडून दरवर्षी किती शुल्क आकारण्यांत आले, एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(४) महाविद्यालयाने किती देणगी स्वीकारली व कोणाकडून स्वीकारली.

(५) शासनाकडून महाविद्यालयाला किती अनुदान दरवर्षी मिळाले व किती मिळण्याचे शिल्लक आहे.

(६) व्यवस्थापक कोटयातून ११ वी व १३ वी च्या तिन्ही शाखेत किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

(७) ११ वी ते १५ वी पर्यंत तिन्ही शाखेतील किती मागासवर्गीय (SC/ST/OBC/VJNT) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली, त्याची रक्कम, विद्यार्थ्यांचे नांव व पत्ते.

(८) १३ वी ते १५ वी मधील तिन्ही शाखेतील प्रत्येक मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक वर्षी किती शुल्क आकारण्यात आले. दरवर्षी एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(९) शासनाच्या आरक्षण धोरणानुसार पोद्दार महाविद्यालयात मागासवर्गीय प्राध्यापकांच्या किती जागा आहेत व किती जागा भरण्यांत आल्या आहेत. किती जागा सन २००६ पर्यंत भरण्याच्या बाकी आहेत.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पोद्दार महाविद्यालय, मुंबई यांचेकडे दि.२८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, पोद्दार महाविद्यालय, मुंबई, श्री.सु.श.बो-हाडे, तसेच अपिलकार श्री.गजानन काळे हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेल्या अहवालाची व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने पोद्दार महाविद्यालयातील कला. वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेतील विद्यार्थी/ विद्यार्थिनींसंबंधीची सन २००० ते २००६ या कालावधीची एकूण ९ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी, पोद्दार महाविद्यालय, मुंबई, यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास सुनावणीच्या वेळी माहिती उपलब्ध करुन दिली. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७४/०२**

**श्री.जितेंद्र टी.मनुबारवाला,** **------ अपीलकर्ता**
**फ्लॅट नं.सी-२७, दुसरा मजला,**
**एल्को आर्केड, हिल रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**जिल्हा निबंधक, सहकारी संस्था (३),**
**पश्चिम उपनगरे, गृहनिर्माण भवन, तळमजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, एच पश्चिम विभाग,**
**सहकार बाजार,चौथा मजला,**
**वांद्रे (प.), मुंबई-४०० ०५०.**

**प्रशासक, द्वारा -एल्को आर्केड, हिल रोड,**
**वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. जितेंद्र टी.मनुबारवाला, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, मुंबई यांच्याकडे दि.१९.१२.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग, मुंबई एल्को आर्केड रेसिडेन्शियलआणि नॉन रेसिडेन्शियल प्रिमायसेस, को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेतील फ्लॅट नं.सी-२७ हा श्री. ठाकोरलाल सी. मनुबारवाला आणि श्रीमती हिराबेन टी. मनुबारवाला यांच्या नावे हस्तांतर केल्याबाबतच्या कागदपत्राच्या छाया प्रतीची मागणी केली होती. "

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा निबंधक, सहकारी संस्था (३), पश्चिम उपनगरे, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांचेकडे दि.५.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१९.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. उपनिबंधक, सहकारी संस्था, एच/पश्चिम विभाग यांनी दि.८.१.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास असे कळविले की, अपिलकाराने मागितलेली माहिती ही संस्थेच्या दप्तरातील असल्याने सदरची माहिती संस्थेशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी. सदरची कागदपत्रे देण्याबाबत संस्थेला सूचना दिलेल्या आहेत असा जन माहिती अधिका-यांनी युक्तिवाद केला. तसेच जन माहिती अधिका-यांनी लेखी म्हणणे सादर करुन त्यात असे म्हटले आहे की, अपिलकाराच्या अर्जास दि. ८.१.२००७ च्या पत्रान्वये उत्तर देण्यात आले असल्याने प्रथम अपील फेटाळण्यात यावे. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ८.१.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याबाबत दि. ३.५.२००७ रोजी जिल्हा उपनिबंधकांच्या सहीने आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था यांच्या वतीने उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था डॉ.व्ही.एस.फड हे हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी केलेला युक्तिवाद ऐकून घेतला व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने एल्को आर्केड रेसिडेन्शियलआणि नॉन रेसिडेन्शियल प्रिमायसेस, को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेतील फ्लॅट नं.सी-२७ हा श्री. ठाकोरलाल सी. मनुबारवाला आणि श्रीमती हिराबेन टी. मनुबारवाला यांच्या नावे हस्तांतर केल्याबाबतच्या कागदपत्राच्या छाया प्रतीची मागणी केली होती. सदर माहिती संस्था पातळीवरील असल्याने ती संस्थेकडून घ्यावी. मागितलेली माहिती अपिलकारास देण्याबाबत संस्थेस सूचना देण्यात आल्या असल्याबाबत अपिलकारास जन

माहिती अधिका-याने उत्तर दिले. परंतु संस्थेने अपिलकारास माहिती दिलेली नाही असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम-२ (जे) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७५/०२**

**श्री. बखर अब्दुल अलीम अहमद,** **------ अपीलकर्ता**
**ई/०२, मिनीनगर को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**एस.एन.दुबे रोड, रावळपाडा,**
**दहिसर (पूर्व), मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,** **------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत विभाग),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री. बखर अब्दुल अलीम अहमद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १९.१.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" मार्वेरोड मालाड (प.) येथील आकाशवाणी भवन जवळील वृंदावन सोसायटीत व्यापारी गाळे, आर.सी. सी.काम, गोडाऊन, बंगलो बांधकाम या अनधिकृत बांधकामबाबात अनुषंगिक माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/एन विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि.७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपिलकार हजर होते. मार्वेरोड, मालाड (पूर्व), एन.डी.झोन वृंदावन सोसायटीच्या २० अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीची अपिलकाराने माहिती मागितली होती. वृंदावन सोसायटीस विशिष्ट अशी सीमा/ हद्द घालून देण्यात आलेली नाही. अपिलकाराने विशिष्ट अशा बांधकामाबाबत माहिती मागितलेली नाही. विशिष्ट अशा बांधकामाबाबत माहिती देण्याची अपिलकाराकडे जन माहिती अधिका-यांनी मागणी केली. परंतु अपिलकाराने विशिष्टअशा बांधकामबाबत माहिती दिली नाही. अपिलकाराकडे तशी माहिती

नव्हती. म्हणून प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना अशा सूचना दिल्या की, अपिलकारासमवेत प्रत्यक्ष जागेवर जावून बांधकामाची एकत्रितपणे तपासणी आयोजित करावी. त्यानंतर अपिलकाराने विशिष्ट अशा बांधकामाबाबत मागितलेली माहिती अपिलकारास दोन आठवडयात उपलब्ध करुन द्यावी. अपिलकार सदर आदेशाने समाधानी झाले असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील निकालात काढले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२५.४.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अपिलकारासमवेत जन माहिती अधिका-यांनी अनधिकृत बांधकामाची एकत्रितरित्या पाहणी आयोजित केली होती किंवा कसे हे अपिलातील कागदपत्रावरुन आढळून येत नाही. परंतु जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री. बखर अब्दुल अलीम अहमद हे हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे सोयीचे व्हावे म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारासमवेत एकत्रितपणे अनधिकृत बांधकामाची तपासणी करावी. त्यानंतर अपिलकारास हवी असलेली माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलकारास माहिती मिळालेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिका-यांनी एकत्रित पाहणी आयोजित करावी. त्यानंतर अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८०/०२**

**श्री. गजानन श्रीकृष्ण काळे,** **------ अपीलकर्ता**
**२३, फ्लॅट एच वन,**
**बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,** **------- उत्तरवादी**
**एलफिन्स्टन महाविद्यालय,**
**१५६, महात्मा गंधी मार्ग, फोर्ट,मुंबई-४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**एलफिन्स्टन महाविद्यालय,**
**१५६, महात्मा गंधी मार्ग, फोर्ट,मुंबई-४०० ०३२.**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. गजानन श्रीकृष्ण काळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक माहिती अधिकारी, एलफिन्स्टन महाविद्यालय, फोर्ट, मुंबई यांचेकडे दि.१६.१.२००७ रोजी अर्ज करुन सन २००० ते २००६ पर्यंतची खालील माहिती मागितली होती.

(१) शासनाच्या नियमानुसार एलफिन्स्टन महाविद्यालयात ११ व १३ वी च्या वर्गासाठी कला, वाणिज्य,
विज्ञान शाखेत जातीच्या वर्गवारी नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, त्याची विद्यार्थ्यांच्या नावानिशी टक्केवारीनुसार माहिती.

(२) १३, १४ व १५ वी पर्यंतच्या तिन्ही शाखेतील विद्यार्थ्यांचे (Library Deposite, Laboratary Deposite, Coution Money) किती गोळा करण्यांत आले. किती विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करण्यांत आली व किती रक्कम महाविद्यालयाकडे शिल्लक आहे.

(३) ११ वी व १२ वी च्या तिन्ही शाखेतील प्रत्येक मुलीकडून दरवर्षी किती शुल्क आकारण्यांत आले, एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(४) महाविद्यालयाने किती देणगी स्वीकारली व कोणाकडून स्वीकारली.

(५)   शासनाकडून महाविद्यालयाला किती अनुदान दरवर्षी मिळाले व किती मिळण्याचे शिल्लक आहे.

(६)  व्यवस्थापक कोटयातून ११ वी व १३ वी च्या तिन्ही शाखेत किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

(७)  ११ वी ते १५ वी पर्यंत तिन्ही शाखेतील किती मागासवर्गीय (SC/ST/OBC/VJNT) विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली, त्याची रक्कम, विद्यार्थ्यांचे नांव व पत्ते.

(८)   १३ वी ते १५ वी मधील तिन्ही शाखेतील प्रत्येक मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रत्येक वर्षी किती शुल्क आकारण्यात आले.  दरवर्षी एकूण शुल्काची किती रक्कम जमा झाली.

(९)   शासनाच्या आरक्षण धोरणानुसार एलफिन्स्टन महाविद्यालयात मागासवर्गीय प्राध्यापकांच्या किती जागा आहेत व किती जागा भरण्यांत आल्या आहेत.  किती जागा सन २००६ पर्यंत भरण्याच्या बाकी आहेत.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही.  त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई यांचेकडे दि.२७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.  सदर अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही.  आदेश पारित केले नाहीत.  त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.  सदर अपिलावर दि.१०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली.  सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई, डॉ.एल.व्हेर, जन माहिती अधिकारी डॉ. आर. एस. धामनस्कर, तसेच अपिलकार श्री.गजानन काळे हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलकाराने एलफिन्स्टन  महाविद्यालयातील कला. वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेतील विद्यार्थी/ विद्यार्थिनींसंबंधीची सन २००० ते २००६ या कालावधीची एकूण ९ मुद्दयांची माहिती मागितली होती. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी

अहवाल सादर केला. तसेच अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी उपलब्ध माहिती अपिलकारास दिली. उर्वरित माहिती २० दिवसांच्या आत अपिलकारास देण्याचे कबूल केले. तसेच महाविद्यालयात कोणत्याही व्यक्तिने माहिती अधिकारांतर्गत विचारलेली माहिती देण्याबाबत नेहमीच सहकार्य करण्यांत येते. परंतु अपिलकाराचे अपील महाविद्यालयात प्राप्त झाले नाही असे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. अपिलकाराने दि.१६.१.२००७ चा माहितीचा अर्ज व दि.२७.२.२००७ चे प्रथम अपील महाविद्यालयात दिले असल्याचे सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी, एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई, यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. ही कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/६९/०२**

**श्री. पी.एस. कोथंडरमन,** **------ तक्रारदार**
**बी-५/४०३, लोक निसर्ग,**
**शामविक ग्लास फॅक्टरीजवळ,**
**घाटीपाडा रोड, बालराजेश्वर रोड,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**टी वॉर्ड मुंबई, ए.सी.सी. कंपाऊंड,**
**जटाशंकर डोसा मार्ग,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.** **------- उत्तरवादी**

## - विवेचन -

तक्रारदार श्री. पी. ए. कोथंडरमन यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, टी विभाग, जटाशंकर डोसा मार्ग, मुलूंड (प.), मुंबई तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक सहकारी संस्था, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.७.२००७ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि. १०.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस यु.पी.सी.ने पाठवूनही जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच तक्रारदार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

तक्रारदार श्री. कोथंडरमन यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, टी विभाग यांच्याकडे दि. १५.५.२००७ रोजी अर्ज करुन, गृहनिर्माण संस्थेच्या गाळेधारकाने मालमत्ता कराचा भरणा परस्पर महानगरपालिकेकडे करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. तक्रारदाराने मागितलेली १ ते ४ मुद्दयांबाबतची माहिती महानगरपालिका व संस्था स्तरावरील असल्याने तक्रारदाराने संबंधित संस्थेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशी दि. १५.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगर

पालिका, टी विभाग, मुंबई यांचेकडे दि. २ जुलै, २००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.७.७.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदाराने मागितलेली माहिती महानगरपालिका व संस्था स्तरावरील असल्याने संस्थेकडे संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी तक्रारदारास दि.१५.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली होती. परंतु तक्रारदाराने संबंधित गृहनिर्माण संस्थेशी संपर्क साधला किंवा कसे हे तक्रारीतील कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तक्रारदाराने दि. २.७.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, टी/ विभाग, मुलूंड, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहायक, ए आणि सी, टी/ विभाग, करनिर्धारण व संकलन खाते, बृहन्मुंबई महानगरपालिका, टी विभाग कार्यालय, मुलूंड (प.), मुंबई यांनी तक्रारदारास दि. ७ जून, २००७ च्या पत्रान्वये सविस्तर मुद्देनिहाय माहिती दिली. तक्रारदार सुनावणीकरिता हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१५/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७०/०२**

**श्री. संदिप तुकाराम पंदेरे,** **------ अपीलकर्ता**
**सचिव,सिध्दीविनायक टेनेन्ट असोसिएशन,**
**सर्वे क्र.८३७, म्युन्सिपल पत्रा चाळ,**
**सेनापती बापट मार्ग,हॉली क्रॉस शेजारी,**
**मुंबई- ४०० ०१३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**तिसरा मजला, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**तिसरा मजला, मुंबई- ४०० ००८..**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. संदिप तुकाराम पंदेरे, सचिव, सिध्दीविनायक टेनेन्ट असो. यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, शेख हफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१९.५.२००७ रोजी अर्ज करुन भूखंड क्र.८३७, लोअर परेल विभाग फाईल क्र.ई.ई.बी.पी.सी./८५६२ जी.एस./अे या भूभागावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेले निवासी इमारतीचे आराखडे हे विकास नियंत्रण नियमावली अधिनियम ३३(७) च्या तरतुदीनुसार असून, त्यात मिळकतीच्या हद्दीनुसार सेट बॅक धरुन क्षेत्रफळ २५८१.३१ चौ.मी.आहे की सेट बॅक सोडून क्षेत्रफळ २५८१.३१ चौ.मी.आहे याबाबतची माहिती मागितली होती.

अपिलकाराने मागितलेली माहिती कार्यालयात रु.२५/- प्रति पान प्रति भाग असे छायांकित प्रती साक्षांकित करण्याचे शुल्क भरुन प्राप्त करु शकतात. तसेच छायांकित प्रती आणण्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च व त्या ठिकाण पर्यंतचा जाण्यायेण्याचा खर्च अपिलकारास करावा लागेल. अपिलकारास हवी असलेली माहिती मंजूर आराखडयात उपलब्ध आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २.६.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, इमारती प्रस्ताव, बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि. १९.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगा कडे दि. २४.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले.सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता कार्यकारी अभियंता, इमारती प्रस्ताव, ई विभाग, भायखळा, मुंबई, श्री.एस.सी.शिंत्रे हे हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने दि. १९.५.२००७ च्या माहितीच्या अधिकारातील अर्जान्वये मिळकतीच्या हद्दीनुसार सेट बॅक धरुन क्षेत्रफळ २५८१.३१ चौ.मी.आहे की सेट बॅक सोडून क्षेत्रफळ २५८१.३१ चौ.मी.आहे याबाबतची माहिती मागितली होती. यापूर्वी याच विषयावर मा. मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे दि. १४.३.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यानुसार अपिलकाराने संबंधित फाईलची पहाणी करुन त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जन माहिती अधिका-यांकडून उपलब्ध करुन घेतल्या आहेत. अपिलकाराने त्याच्या तक्रारीसंबंधी महापालिका आयुक्तांकडे दाद मागावी असे आदेशात नमूद करुन अपील अमान्य करण्यांत आले आहे. सदर बाब लक्षात घेता अपिलकारास हव्या असलेल्या माहितीसंबंधीच्या छायांकित प्रती त्यांना प्राप्त झाल्या असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३३/०२**

**श्री. गुरुनाथ अंबादास बासुतकर ------ अपीलकर्ता**
**सुकाबाई चाळ, हरियाली व्हिलेज ग्रूप न.२**
**गणेश मार्ग, विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, ------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस. विभाग,**
**लालबहादूर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोलपंपाजवळ,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस. विभाग,**
**लालबहादूर शास्त्री मार्ग, मंगतराम पेट्रोलपंपाजवळ,**
**भांडूप (प.), मुंबई- ४०० ०७८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. गुरुनाथ अंबादास बासुतकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) एस विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भांडूप, मुंबई यांचेकडे दि.५.३.२००७ व दि.१३.३.२००७ रोजी अर्ज करुन त्यांच्या सुकाबाई चाळ, रुम क्र.६, गणेशमार्ग, हरियाली व्हिलेज ग्रूप क्र.२, विक्रोळी घराच्या बाजूला असलेले बांधकाम सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक असल्याने सदर अनधिकृत बांधकाम (निकृष्ट दर्जाची गॅलरी) पाडणेबाबत/ बांधकामावर कारवाई करणे बाबत मागणी केली होती.

प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आली. सदर जागी कोणतेही अनधिकृत बांधकाम, नव्याने चालू असल्याचे अथवा नुकतेच करण्यात आल्याचे आढळून आले नाही. नमूद निवासी गाळा अत्यंत जुना असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदर रुम क्र.१ च्या गाळेधारकास सदर मोडकळीस आलेले बांधकाम काढून टाकण्याबाबत अथवा दुरुस्त करण्याबाबत दि. ४.९.२००६ च्या पत्रानुसार कळविण्यांत आले.

गाळेधारकाने त्याच्या गाळयास दुरुस्तीची परवानगी मिळण्यासाठी विनंती अर्ज सादर केला. गाळेधारकाकडून प्राप्त कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.११.२००६ व दि.१७.३.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे दि. २०.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एस/विभाग, भांडूप, मुंबई यांचेकडे दि.८.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी घेतली. सहायक अभियंता (इ) यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पहाणी केली. तेव्हा असे समजले की, या अगोदर कार्यकारी अभियंता (विशेष) यांनी जागेची पहाणी केली. त्यांच्या अभिप्रायानुसार सदर बांधकाम धोकादायक नसल्याचे निदर्शनास आले. कार्यकारी अभियंता (विशेष) (परिमंडळ-६) यांच्या तपासणी अहवालाची प्रत प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास उपलब्ध करुन दिली. तसेच खालीलप्रमाणे दि.२०.६.२००७ रोजी आदेश पारित केले.

> " आपण अलिकडे याच संदर्भात माझी वेगळी भेट घेतलेली असून आपल्याला वाटणा-या भितीबद्दल (शेजारची इमारत आपल्या इमारतीवर कोसळेत) नमूद केलेले होते. त्यामुळे मी असे आदेश देतो की, सहाय्यक अभियंता (इ) यांनी कार्यकारी अभियंता (विशेष) (परि.६) यांच्यासोबत पुन्हा एकदा पुढील सात दिवसांत आपण नमूद केलेल्या धोकादायक वास्तूचे तांत्रिकदृष्टया निरीक्षण करुन आपला अहवाल सादर करावा व त्या अहवालानुसार दुय्यम अभियंता (इ.) यांनी नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.६.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एस विभाग, प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एस विभाग, भांडूप, मुंबई तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपिलकार सुंकाबाई चाळ, रुम क्र.६, गणेशमार्ग, हरियाली व्हिलेज ग्रूप क्र.२, विक्रोळी येथे राहतात. त्यांच्या घराच्या बाजूला असलेले बांधकाम सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असल्याने सदर अनधिकृत बांधकाम (निकृष्ट दर्जाची गॅलरी) पाडणेबाबत/ बांधकामावर कारवाई करणेबाबत केलेल्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. रुम क्र.१ च्या गाळेधारक इमतियाझ टाझीर, २/२६३/३४५९, टागोरनगर, विक्रोळी, मुंबई यांना जन माहिती अधिका-यांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ३५१ अन्वये दि.१.९.२००८ रोजी सहायक आयुक्त, एस विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, भांडूप, मुंबई यांनी नोटीस दिली आहे. त्यानुसार अपिलकाराने तक्रार केलेल्या बांधकामाबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांकडून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर गाळेधारकाच्या बांधकामाबाबत यापुढे केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारासजन माहिती अधिका-यांनी द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७२/०२**

**श्री. निखिल एन.सायता,** **------ अपीलकर्ता**
**वल्लभ टेरेस, फ्लॅट नं.१२, २ रा मजला,**
**५०५, सरदार व्ही.पटेल रोड,**
**ऑपेरा हाऊस, मुंबई- ४०० ००४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इमारत प्रस्ताव शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव शहर),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग,**
**हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. निखिल एन. सायता, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि.१२.५.२००७ रोजी अर्ज करुन गेल्या पाच वर्षात अनधिकृत बांधकामाबाबत आलेल्या तक्रारी, त्यावर केलेली कार्यवाही, प्रलंबित तक्रारी, तक्रारी प्रलंबित रहाण्याची कारणे, कार्यवाही केली असल्यास केव्हा कार्यवाही केली त्याबाबतच्या तारखा, वेळ इ.विभागनिहाय अनधिकृत बांधकामाच्या तक्रारीबाबतच्या कागदपत्रांची तपासणी करण्याबाबत मागणी केली. तसेच, सी वॉर्डातील भूलेश्वर येथील सर्वे नं.१५६९ च १५७० व नवीन १४४७ व १४४८, काळबादेवी रोड येथील कॉटन एक्सचेंज इमारतीच्या पुनर्बांधणी संबंधीच्या प्रस्तावात केलेल्या बदलासंबंधीची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता, (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, ई विभाग, हफिजउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई यांच्याकडे दि. ४.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास दि. १२.७.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे दि. २४.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ८.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.एस.सी.शिंत्रे तसेच अपिलकार श्री.निखिल सायता हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने अनधिकृत बांधकामाबाबत तसेच कॉटन एक्सचेंज इमातीच्या पुनर्बांधणीबाबत दि. १२.५.२००७ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे मुद्देनिहाय माहिती दि. १२.७.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येते. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर आवश्यक ती कार्यवाही विहित कालावधीत करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव), बृहन्मुंबई महानगरपालिका, भायखळा, मुंबई यांना समज देण्यांत येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८०५/०२**

**श्री. विकास सुधाकर हरियाण,** **------ अपीलकर्ता**
**लखमा जानू खोत चाळ, न्यू आग्रीपाडा,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा समादेशक,** **------- उत्तरवादी**
**मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड,**
**नारायण नगर, नारी सेवा सदन रोड,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८४.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
**मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड,**
**नारायण नगर, नारी सेवा सदन रोड,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८४.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. विकास सुधाकर हरियाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, नारायणनगर, घाटकोपर, मुंबई यांच्याकडे दि.९.४.२००७ रोजी अर्ज करुन खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

(१) खालील मानसेवी पदांकरिता कोणत्या हुद्दयांपासून कोणत्या हुद्दयांपर्यंतच्या अधिकारी यांची नेमणूक करतात.

(अ) समादेशक अधिकारी पथक/ परिमंडळ

(आ) प्रशासिक अधिकारी

(२) पद व हुद्दा हे एकच आहेत किंवा वेगवेगळे आहेत याबद्दलची माहिती द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नयल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा समादेशक, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, नारायणनगर, घाटकोपर, मुंबई यांच्याकडे दि.२५.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.६.२००७ च्या पत्रान्वये माहितीपोटी रु.३६/-एवढी रक्कम कार्यालयात जमा केल्यानंतर माहिती

उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपिलकारास कळविले. त्यानंतर दि.२५.६.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१५.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्रीमती स्वा.वि.रायकर, तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व समादेशक, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, नारायणनगर, घाटकोपर, मुंबई यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की,अपिलकाराने समादेशक अधिकारी पथक/ परिमंडळ, प्रशासकीय अधिकारी या पदाकरिता कोणत्या हुद्दयापासून कोणत्या हुद्दयापर्यंतच्या अधिका-याची नेमणूक करतात याबाबत माहिती मागितली आहे. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, नारायणनगर, घाटकोपर, मुंबई कार्यालयात मानसेवी समादेशक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी ही पदे अस्तित्वात नाहीत. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्थेमार्फत फक्त होमगार्डना प्रशिक्षण देण्यात येते. होमगार्ड भरती होत नाही. समादेशक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी ही मानसेवी पदे असून, ती जिल्हा कार्यालयाच्या पथक/ परिमंडळ येथे अस्तित्वात असतात. त्याबाबत सूचना/आदेश हे होमगार्ड मुख्यालयाकडून दिले जातात. अपिलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली आहे. अन्य इतर आवश्यक माहितीकरिता अपिलकाराने होमगार्ड मुख्य कार्यालयातील सक्षम प्राधिका-याकडे संपर्क साधावा असेही अपिलकारास प्रथम अपिलीय अधिका-यांनी कळविले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपिलकारास सर्वतोपरी माहिती दिली असल्याचे स्पष्ट होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७५०/०२**

**डॉ.विनोदकुमार एल.धवन,** **------ अपीलकर्ता**
**१०१, कृष्णकुंज को.ऑप.हौ.सोसायटी,**
**फ्लॅट नं.१३, एल.टी.नगर रोड नं.१,**
**एम.जी.रोड, गोरेंगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,** **------- उत्तरवादी**
**पाटकर कॉलेज, एस.व्ही.रोड,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**जन माहिती अधिकारी,**
**प्राचार्यांचे कार्यालय, पाटकर कॉलेज,**
**एस.व्ही.रोड,गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**- विवेचन -**

अपिलकार डॉ.विनोदकुमार एल.धवन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी, प्राचार्यांचे कार्यालय, पाटकर कॉलेज, गोरेगांव, मुंबई यांचेकडे दि.५.१२.२००६ रोजी अर्ज करुन सन २००१ ते २००६ या कालावधीची पुढील माहिती मागितली होती.

" एस.व्ही.रोड, गोरेंगाव (प.) मुंबई येथील पाटकर महाविद्यालयातील शिक्षकांनी सेवेत असताना धारणाधिकारासाठी (Lien) केलेले अर्ज, त्यासाठी दिलेली कारणे/ भूमिका, किती शिक्षकांचे धारणाधिकाराचे अर्ज मंजूर केले, किती शिक्षकांचे धारणाधिकाराचे अर्ज सक्षम प्राधिका-यांनी अमान्य केले. याबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली होती. "

सन २००१ ते २००६ या कालावधीत पाटकर महाविद्यालयात शिक्षकांना धारणाधिकार मंजूर अथवा अमान्य केलेले नाही. शिक्षकांना दिर्घ मुदतीची रजा, असाधारण रजा विशिष्ट परिस्थितीत मंजूर करण्यांत येते असे जन माहिती अधिकार, पाटकर महाविद्यालय यांनी दि. ९.२.२००७ च्या पत्रान्वये विहित कालावधी उलटून गेल्यानंतर अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी खोटी व चुकीची माहिती दिल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पाटकर कॉलेज, गोरेगांव, मुंबई यांचेकडे दि. ५.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. पाटकर कॉलेजमधील श्रीमती एन.जी. नाडकर्णी हया यु.जी.सी.च्या सुधारणा कार्यक्रमासाठी रजेवर आहेत. डॉ. रमेश यामगर हे रजेवर, प्रतिनयुिक्तीवर आहेत की Lien वर आहेत हे खात्रिलायकरित्या माहिती नाही. डॉ. एस.एस.संख्ये यांची धारणाधिकार मंजूर करण्यासाची विनंती महाविद्यालयाच्या

समितीने मान्य करुन प्रस्ताव मंजुरीसाठी शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचे कार्यालय, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई यांचेकडे पाठविला असल्याची माहिती अपिलकारास दि.१९.४.२००७ च्या पत्रान्वये दिली. तसेच, जन माहिती अधिका-याने दिलेली माहिती खोटी अगर दिशाभूल करणारी नाही असे अपिलकारास कळवून विलंबाबाबत माफी मागितली.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी, तथा प्राचार्य, पाटकर कॉलेज, गोरेगांव, मुंबई, डॉ.उदय माशेलकर, तसेच अपिलकार डॉ.विनोदकुमार धवन हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने पाटकर महाविद्यालयातील शिक्षकांनी सन २००१ ते २००६ या कालावधीत धारणाधिकारासाठी केलेले अर्ज कॉलेजच्या सक्षम प्राधिका-यांनी मान्य/अमान्य केल्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. अपिलातील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, शिक्षकांचे धारणाधिकाराचे (Lien) अर्जास पाटकर महाविद्यालयातील समितीची मान्यता घेऊन प्रस्ताव मंजुरीसाठी शिक्षण उप संचालकांकडे पाठविण्यात येतात. तसा डॉ.एस.एस.संख्ये यांचा तसेच डॉ.आर.एस.यामगर यांचा प्रस्ताव शिक्षण उप संचालकांकडे प्रथम अपिलीय अधिका-यांनी पाठविला. असे असताना अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.९.२.२००७ च्या पत्रान्वये चुकीची माहिती दिली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांची ही कृती निश्चितच योग्य नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनीही अपिलकारास मागणी केलेली कागदपत्र दि.१९.४.२००७ च्या पत्रासोबत दिली नाहीत. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, पाटकर महाविद्यालयात सन २००१ ते २००६ या कालावधीत शिक्षकांना धारणाधिकार, (Lien) शिक्षण उपसंचालकांच्या मान्यतेने मान्य/ अमान्य केल्याबाबतच्या संबंधित कागदपत्राच्या छायाप्रतीसह माहिती, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत द्यावी. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७५५/०२**

**श्री. बी. ए. अलीम,** **------ अपीलकर्ता**
**ई/०२, मिनीनगर को.ऑप.हौ.सोसायटी,**
**एस.एन.दुबे रोड, रावळपाडा,**
**दहिसर (पूर्व), मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,** **------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन,मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (इमारत प्रस्ताव),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग,**
**लिबर्टी गार्डन,मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

## - विवेचन -

अपिलकार श्री. बी.ए.अलीम, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, (इमारती प्रस्ताव),पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांचेकडे दि.२७.१०.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" मार्वे रोड मालाड (प.), गार्डन व्हिला रिसॉर्ट समोरील आकाशवाणी भवन जवळील वृंदावन सोसायटीत अनधिकृतपणे व्यापारी गाळे, चार रो हाऊसेस, ५० पक्क्या खोल्यांचे बांधकाम इ. विरुध्द कारवाई करण्याबाबत जनहित संस्थेने तसेच अपिलकाराने दि.४.७.२००५, ११.८.२००५, ३१.८.२००५ व दि.२२.५.२००६ रोजी केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, यांचेकडे दि. १२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी /उत्तर विभाग यांनी तिद.१६.१.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सदर सुनावणीचेवेळी अपिलकार हजर होते. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती दिली नसल्याचे प्रतिपादन केले. अपिलकारास दोन पत्रान्वये माहिती दिली असल्याचे नमूद करुन पत्राच्या छायाप्रती अपिलकारास दिल्या. प्रत्यक्ष जागेवर अपिलकारासमवेत संयुक्त तपासणी आयोजित करण्यात यावी असा जन

माहिती अधिका-यांनी आग्रह धरला. बृहंन्मुंबई महानगरपालिकेचा सन २००७ चा निवडणूक कार्यक्रम संपल्यानंतर अपिलकारासमवेत संयुक्तरित्या बांधकामाची तपासणी करावी. याबाबत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी लेखी पत्र द्यावे असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२०.१.२००७ रोजी आदेश पारित केले.

जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी संयुक्त पहाणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, श्री.एम.एम.क्षीरसागर, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, पी/उत्तर विभाग, श्री. सु.का.एकबोटे, तसेच अपिलकार श्री.बी.ए.अलीम हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता मार्वे रोड मालाड (प.) आकाशवाणी भवन जवळील वृंदावन सोसायटीतील अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करण्याबाबत अपिलकाराने लेखी तक्रार केली होती. सदर केलेल्या कारवाईची माहिती देण्याबाबत माहितीच्या अधिकारात दि. २७.१०.२००६ रोजी जन माहिती अधिका-याकडे मागणी केली. अपिलकारास माहिती देणे सोयीचे व्हावे म्हणून अपिलकारासमवेत कथित अनधिकृत बांधकामाची संयुक्त पहाणी आयोजित करण्यांत यावी. त्यानंतर अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांनी निर्णय घेऊनही संयुक्त पहाणी आयोजित केली नाही. अपिलकारास माहिती दिली नाही. हे निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्यात येईल याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१६/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७४८/०२**

**श्री. रामदास पी. सब्बन,** **------ अपीलकर्ता**
**११, बीऊमन चेंबर्स,**
**२७/३३, नगीनदास मास्टर रोड,**
**पहिला मजला, वेलकम रेस्टॉरंटजवळ,**
**फ्लोरा फाऊंटन, मुंबई- ४०० ००१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,** **------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /उत्तर विभाग,**
**प्लॉट नं.९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा (पूर्व), मुंबई- ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ /उत्तर विभाग,**
**प्लॉट नं.९६, भाऊ दाजी रोड,**
**माटुंगा (पूर्व), मुंबई- ४०० ०१९**

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार श्री. रामदास पी.सब्बन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांच्याकडे दि.२८.३.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(अ) एखादा भाडेकरु त्याच्या/ तिच्या हयातील भाडेपावती हस्तांतरित करु शकतो का ?

(ब) याबाबतचा कायदा, नियम, कलम किंवा तो त्याच्या पत्नीच्या नावाने हस्तांतरित करु शकतो याबाबतचे सूचनापत्र.

(क) हस्तांतरण बाबतची कार्यप्रणाली.

(ड) पत्नीच्या नांवे हस्तांतरण करण्याकरिता लागणारे कागदपत्र.

(इ) एकूण हस्तांतरण शुल्क.

(फ) हस्तांतरण करण्यासाठी लागणारा कालावधी.

अपिलकाराने विशिष्ट प्रकरणाबाबत विशिष्ट अशी माहिती मागितली नाही. प्रश्न स्वरुपात माहिती मागितली. विशिष्ट अशी माहिती मागितलेली नाही. या कारणावरुन माहिती देता येत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.७.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई यांच्याकडे दि.३.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२१.५.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिका-यांनी असे प्रतिपादन केले की, प्रचलित हस्तांतरण धोरणानुसार पती किंवा पत्नी आपल्या हयातीत परस्परांच्या नांवे हस्तांतरण करु शकत नाहीत. तथापि, काही विशिष्ट परिस्थितीत विधी अधिका-यांच्या कायदेशीर सल्ल्यानुसार सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने अशी हस्तांतरण प्रकरणे निकाली काढली जातात. अशा प्रकारचे विवेचन केले असता माहिती अधिका-याने स्वतःचे मत प्रदर्शित केले असे होईल. अर्जदाराने विशिष्ट प्रकरणाचा उल्लेख करुन त्या प्रकरणी माहिती मागितल्यास माहिती देण्यात यावी असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ७.६.२००७ रोजी अपिलकाराचे दि. ३.५.२००७ चे प्रथम अपील निकाली काढण्याचे आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.४.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एफ/उत्तर विभाग, श्री.सुहास के.करवंदे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, एफ/उत्तर विभाग, श्री. प्रकाश य. वालकर हे हजर होते. अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेले प्रतिपादन ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

अपिलकाराने मागितलेल्या माहितीबाबत अवलोकन केले असता असे दिसून येते की, विशिष्ट असा संदर्भ देवून माहिती मागितलेली नाही. प्रश्न स्वरुपाची माहिती मागितली असल्याचे दिसून येते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. अपिलकाराने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सर्वसाधारण स्वरुपाची (General) माहिती मागितली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-यांनी ३० दिवसांचे आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई/दिनांक :-१७/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/४७४/०२**

**श्री. सुशील जे. शिवदासानी,** **------ अपीलकर्ता**
**ई-३, पालाकिमो, सिल्वर ओकस् इस्टेट,**
**भुलाभााई देसाई रोड, मुंबई- ४०० ०२६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**महापालिका आयुक्त, नगर रचना,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक संचालक, नगर रचना,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. सुशील जे, शिवदासानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे दि.२९.९.२००६ रोंजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" ५२/७ ते १४, ५६/६ येथे हिरानंदानी प्रॉपर्टीज प्रायव्हेट लि. येथे झोरा नावाच्या इमारतीचे बांधकाम केले. त्याबाबतची अनुषंगिक माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी, अपिलकाराने मागितलेली माहिती तयार ठेवली. त्यानंतर सदर माहिती प्राप्त करण्याकरिता अपिलकारास भ्रमण दुरध्वनीवर अनेकदा कळविले. कारण अपिलकाराने टपालाद्वारे माहिती मागितली नव्हती. माहिती मुदतीत संकलित करण्यो/ तयार करण्याचे काम केले. माहिती देण्याकरिता जन माहिती अधिका-यांनी अर्जदाराच्या पत्त्यावर शिपाई पाठविला. अपिलकाराच्या घरातील व्यक्तिंनी माहिती घेण्यास नकार दिला. अपिलकारास त्यांच्या घरच्या दूरध्वनी क्र. २३५२५५७५ वर संपर्क साधला. अपिलकार उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे पोच देय डाकेने जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती पाठविली. असा जन माहिती अधिका-यांनी दि. ११.६.२००८ रोजी लेखी खुलासा आयोगाकडे सादर केला.

अपिलकाराने दरम्यानच्या कालावधीत प्रथम अपिलीय अधिकारी तथा महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन

देण्याबाबत जन माहिती अधिका-यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. सुनावणीकरिता दोनवेळा नोटीस पाठवूनही अपिलकार हजर राहिले नाहीत. नोंदणीकृत डाकेद्वारे माहिती अपिलकारास दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपील निकाली काढले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगा कडे दि. २९.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता यु.पी.सी.ने नोटीस पाठवूनहजी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकारास माहिती देण्यात जन माहिती अधिका-यांनी कुचराई केल्याचे दिसून येत नाही. सर्वतोपरी प्रयत्न करुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/४३१/०२**

**श्री. गुरुमुखसिंग साहनी ,** **------ तक्रारदार**
**२९९४-१२, ब्लॉक नं.१३४,**
**हिंदुस्थान चौकसमोर, मुलूंड कॉलनी,**
**मुलूंड, मुंबई- ४०० ०८२.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.**
**प्रकाशदीप, लोक एव्हरेस्ट कॉम्प्लेक्स,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.** **------- उत्तरवादी**

**- विवेचन -**

तक्रारदार श्री. गुरुमुखसिंग साहनी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मुलूंड, मुंबई यांच्याविरुध्द तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.७.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, श्री. पी.एस.झांबरे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी हे हजर होते. तक्रारदार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची व तक्रारीतील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांच्याकडे दि.२७.११.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

(१) प्राथम्याने तक्रारदाराचे विद्युत मीटर संबंधित बॉक्समध्ये बसवून देणे.

(२) श्रीमती शकुंतला आर.पांडे (विद्युत कंझुमर क्र. ९२०२८९७६) यांनी विद्युत मीटर करिता सादर केलेल्या अर्जाची प्रत. (फॉर्म ए-१).

(३) श्रीमती पांडे यांनी हिंदुस्थान चौक, मुलूंड कॉलनी, मुंबई येथील जागा (premises) क्र.२९९४-१२ संबंधी गाळेधारक, जमीन मालक, पोटभाडेकरु, न्यायिक ताबेदार यापैकी कोणते Status नमूद करुन विद्युत जोडणीकरिता शपथपत्र दाखल केले होते.

(४) विद्युत जोडणीकरिता श्रीमती पांडे यांनी निवासस्थानासंबंधी सादर केलेल्या पुराव्याच्या/ कागदपत्राच्या प्रती.

(५) निवासस्थानाचा पुरावा म्हणून श्रीमती पांडे यांनी सादर केलेल्या शिधापत्रिकेची प्रत.

(६) सक्षम न्यायालयात दाखल करण्याकरिता लाईनमन, उप अभियंता, सहायक अभियंता, उप विभागीय लेखाधिकारी यांची नांवे व पत्ते.

(७) ज्यांनी खोटा टेस्ट रिपोर्ट दिला त्या विद्युत कंत्राटदाराचे नांव, पत्ता, लायसन क्रमांक.

श्रीमती शकुंतला पांडे यांची विद्युत जोडणीसंबंधीची सन १९९६ मधील फार जुनी कागदपत्र असल्याने सापडत नाहीत. न्यायालयाच्या आदेशानुसार सद्यःस्थितीच्या विद्युत जोडणीसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. यासंबंधीची माहिती उपलब्ध करुन देण्यापोटी टपाल खर्चासहित रु.५०/- इतकी रक्कम कार्यालयात भरणा करण्या बाबत जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१० ऑगस्ट,२००६ रोजी कळविले. त्याप्रमाणे तक्रारदाराने रु.५०/- इतक्या रकमेचा भरणा केला. परंतु अद्याप तक्रारदारास जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही.

यामुळे व्यथित होऊन तक्रारदाराने गैरतक्रारदार तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मुलूंड, मुंबई, यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ३.८.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन मा.मुख्य माहिती आयुक्तांनी दि. १९.९.२००७ रोजी आदेश पारित करण्यात आले. जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियमातील कलम ८ (सी) नुसार मागणी क्र. ५, ६ व ७ बाबत माहिती नाकारली. सदर मुद्दयाची माहिती तक्रारदारास देण्यासाठी कलम ८ (सी) लागू होत नाही. तेव्हा तक्रारदारास याबाबत तात्काळ माहिती द्यावी. इतर मुद्दयांबाबत माहिती देण्याकरिता संबंधित फाईलचा जाणिवपूर्वक शोध घ्यावा व तक्रारदारासा माहिती द्यावी असे आदेश पारित केले.

मा. राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी दि. १९.९.२००७ च्या आदेशास अनुसरुन सर्व संबंधित अधिका-यांनी खालीलप्रमाणे प्रमाणपत्र सादर केले.

" महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे आदेश दि. १९.९.२००७ नुसार सर्वोदय उपविभाग बिलींग विभागाचे ताब्यात असलेले श्रीमती शकुंतला पांडे, ग्राहक क्र. ९२०२८९७६ चे वीज कनेक्शन संबंधित कागदपत्रे सदर उप

विभागाचे बिलींग प्रमुख श्री. शिवाजी गोविंद इंगळे, सहायक माहिती अधिकारी, सर्वोदय उपविभाग यांनी सर्वोदय उपविभाग प्रमुख श्री.प्रफुल्ल हरिश्चंद्र शिर्के, श्री. हनुमान नाना अहिरे, सहायक माहिती अधिकारी, मुलूंड विभाग व श्री. प्रमोद महिपत झांबरे, माहिती अधिकारी, मुलूंड विभाग यांचे समवेत कार्यकारी अभियंता, मुलूंड यांचे निरीक्षणाखाली संबंधित कागदपत्रे शोधण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला असून संबंधित कागदपत्रे खूपच जुनी असल्यामुळे उपलब्ध झाली नाहीत व त्यामुळे संबंधित कागदपत्रे श्री. गुरुमुखसिंग साहनी यांना माहिती अधिकार कायद्यानुसार देता आलेली नाहीत. "

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने श्रीमती पांडे यांच्या विद्युंत जोडणीसंबंधी माहिती मागितली होती. परंतु संबंधित कागदपत्राचा कसोशीने शोध घेऊनही उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे माहिती देता आलेली नाही. या प्रकरणी कागदपत्र उपलब्ध होतात किंवा नाही याबाबत उच्चस्तरावरुन तपासणी होणे आवश्यक आहे. तरी मुख्य अभियंता, महावितरण, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचे स्तरावरुन संबंधित कागदपत्रांचा शोध घ्यावा, शोधाअंती संबंधित कागदपत्र उपलब्ध होतात किंवा नाही याबाबत मुख्य अभियंत्यांनी अंतिम निष्कर्षाप्रत यावे व त्यांनी काढलेला निष्कर्ष तक्रारदारास कळवावा. तसेच त्याची प्रत राज्य माहिती आयोगाकडे पाठवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-१८/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८४०/०२**

**श्री. अप्पा केकाणे,** **------ अपीलकर्ता**
**ई-३, पालाकिमो, सिल्वर ओकस् इस्टेट,**
**भुलाभााई देसाई रोड, मुंबई- ४०० ०२६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप मुख्य अभियंता (स्थापत्य),**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २ रा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, २ रा मजला,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**- विवेचन -**

अपिलकार श्री. अप्पा केकाणे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१३.१२.२००६ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" मिळकत व्यवस्थापक (४) मुंबई मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचे पत्र दि.७.६.२००६ व पत्र क्र. मि.व्य.-५/मुं.मं./मा.अ./३९०५/२००६, दि.२८.११.२००६ अन्वये उन्नत नगर-४ (इमारत क्र.१ ते ८ व १० ते १३) सी.सी.आय. कॉलनी, सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितचा अभिहस्तांतरणाकरिता मिळकत व्यवस्थापक (४) मुंबई दिलेल्या तपशिलवार नकाशाची प्रत. "

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (स्थापत्य), मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१३.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेऊन उर्वरित माहिती अपिलकारास ४५ दिवसांच्या आत देण्याबाबत आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती

अधिका-यांनी अद्याप माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिली. उर्वरित माहिती ४५ दिवसांच्या आत अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. परंतु अपिलकारास आवश्यक ती माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन दिल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८४१/०२**

**श्रीमती पूनम प्रविण पटेल,** **------ अपीलकर्ता**
**१७, विजय भारत, ४ था मजला,**
**सहयोग नगर, चार बंगला,**
**अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप निबंधक सहकारी संस्था,**
**म्हाडा, तळमजला, रुम नं.६९/अे,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३),**
**म्हाडा, तळमजला, रुम नं.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्रीमती पूनम प्रविण पटेल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दि.७.४.२००६ रोजी अर्ज करुन विजय भारत को.ऑप.हौसिंग सोसा.अंधेरी, मुंबई यांनी संस्थेमध्ये माहे एप्रिल,२००६ पर्यंत समाजकल्याण कार्यालयाकडून किती सभासदांना मंजुरी देण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२५.४.२००६ च्या पत्रान्वये अशी माहिती दिली की, संस्थेत वेळोवेळी समाजकल्याण कार्यालयाकडून मंजुरी मिळालेल्या सभासदांची आदेशाची प्रत संस्था व सभासद यांच्याकडे असते. प्रत्येक सभासदाबाबतची माहिती संस्थेच्या दप्तरी अद्ययावत ठेवण्यांत येते. अपिलकाराने मागणी केलेली सभासदांची माहिती जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही. माहितीसाठी अपिलकाराने संस्थेशी संपर्क साधल्यास माहिती उपलब्ध होऊ शकेल असे अपिलकारा कळविले.

त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, म्हाडा, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.१९.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.७.२००७ रोजी द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांच्यावतीने श्री.एम. एन.चाटसे, सहकार अधिकारी, श्रेणी-१, म्हाडा तसेच अपिलकार श्रीमती पूनम पटेल या हजर होत्या.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने विजय भारत को.ऑप.हौसिंग सोसायटी, अंधेरी, मुंबई या संस्थेची माहिती मागितली होती. सदरची संस्था उप निबंधक सहकारी संस्था, के/ पश्चिम विभाग, मुंबई यांच्या अधिपत्याखाली येत असल्यामुळे अपिलकाराचा अर्ज त्यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आला होता. उप निबंधक सहकारी संस्था यांनी अपिलकारास असे कळविले की, सभासदांची यादी संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून मंजूर करण्यात येते. याबाबतची माहिती उप निबंधक कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे माहिती नाकारली. अपिलकाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयाशी संबंधित नव्हती. तेव्हा जन माहिती अधिका-यांनी उक्त अधिनियम ६ (३) (एक) अन्वये अपिलकाराचा अर्ज विहित कालावधीत संचालक, समाजकल्याण पुणे यांच्याकढे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी हस्तांतरित करणे आवश्यक होते. परंतु जन माहिती अधिका-यांनी तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपिलकाराचा अर्ज हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संचालक, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतरित करावा व तसे अपिलकारास कळवावे. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील अशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८३९/०२**

**श्री. आनंद दादासाहेब चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**इ. क्र.३/१, २ सुंदर नगर, कालिना,**
**सांताकूझ(पूर्व), मुंबई- ४०० ०९८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मिळकत व्यवस्थापक-२,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहमुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**मिळकत व्यवस्थापक-२,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आनंद दादासाहेब चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सह मुख्य अधिकारी, मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि. १८.९.२००६ रोजी अर्ज करुन अपिलकार श्री.आनंद चव्हाण यांच्या नावावर सुदंरनगर, कलिना येथील कार्यालयीन इमारत क्र.३ मधील गाळा क्र. १ च २ असून, मालकी तत्वावर जागेची किंमत भरण्याबाबत अनुषंगिम माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, मिळकत व्यवस्थापक-२, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे दि.९.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिका-यांच्यावतीने श्री. एस.आर.काकड, तसेच श्री.एस.के.भरणकर, वास्तुशास्त्रज्ञ हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिका-यांच्या प्रतीनिधीने सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, मिळकत व्यवस्थापक-२, गृहनिर्माण भवन, वांद्रें, मुंबई यांनी अपिलकारास सुंदरनगर, कलिना येथील कार्यालयीन इमारत क्र.३ मधील गाळा क्र.१ व २ हे भाडे तत्वावर वितरित करण्यात आले. सदर गाळयाची विक्री किंमत व भुई भाडे व इतर देय रक्कम मंडळाकडे भरणा करण्याबाबत दि. २०.४.२००४ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. यानुसार अपिलकार श्री. आनंद चव्हाणे् यांनी रु.१४,७८,६५९/- इतकी रक्कम भरणा करावयाची होती. अपिलकाराने त्यास दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता न करता गाळयाची विक्री किंमत कमी करावी अशी मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांना विंनंती केली होती. वरिष्ठ कार्यालयाकडून विक्री किंमत कमी करण्याबाबत कोणतेही ओदश मिळकत व्यवस्थ्थापक-२ यांना प्राप्त झाले नाहीत. सदर बाब जन माहिती अधिका-यांनी दि. १.३.२००७ च्या पत्र क्र.६०३ व दि. २४.१०.२००७ च्या पत्र क्र.३२०० या पत्रान्वये कळविले. याबाबत सध्या न्यायालयात याचिका क्र. १२९५/२००८ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असा लेखी अहवाल सादर करुन जन माहिती अधिका-यांच्या प्रतिनिधींनी सुनावणीच्यावेळी युक्तिवाद केला. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते. या परिस्थितीत अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८४३/०२**

**श्री. अरुण कृष्णा गवेकर,** **------ अपीलकर्ता**
**२५ अे/२०२, सुयोग, बिबिसार नगर,**
**पश्चिम द्रूतगती मार्ग,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**मिळकत व्यवस्थापक-४,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मिळकत व्यवस्थापक-४,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.अरुण कृष्णा गवेकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. ५.४.२००७ रोजी अर्ज करुन बिंबिसार नगर, गोरेगांव, मुंबई येथील इमारत क्र.२५ मधील सदनिका धारकांकडून घेतलेल्या देखभाल खर्चाच्या आगाऊ रकमेच्या परताव्याबाबत अनुषंगिक एकूण १० मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-४, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, वांद्रे, मुंबई, यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.८.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर होते.

सुनावरीलच्यावेळी अपिलातील कागदपत्र्ांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने बिंबिसार नगर, गोरेगांव, मुंबई येथील इमारत क्र.२५ मधील सदनिका धारकांकडून घेतलेल्या देखभाल खर्चाच्या आगाऊ रकमेच्या परताव्याबाबत अनुषंगिक एकूण १० मुद्यांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चित योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपिलकारास माहिती उपलब्ध करुन द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८४४/०२**

**श्री. प्रभुदयाल तारांचद तंवर,** **------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं.८१, ताराचंद चाळ, खेरवाडी,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहाय्यक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानरगपालिका,**
**एच/पूर्व विभाग, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानरगपालिका,**
**एच/पूर्व विभाग, प्रभात कॉलनी,**
**सांताक्रूझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५४.**

**- <u>वि वे च न</u> -**

अपिलकार श्री. प्रभुदयाल ताराचंद तंवर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.), मुंबई महानगरपालिका, एच/पूर्व विभाग, सांताक्रूझ, मुंबई यांय्याकडे दि.३०.३.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" सहा. म.न.पा.आयुक्त, एच/पूर्व विभाग चे पत्र क्र. एएमसी/ एचई/ ३९९/ एईबीएफ, दि.१२ एप्रिल,२००१ चे आणि सहा. म.न.पा. आयुक्त, एच/पूर्व विभागचे पत्र क्र. सहा. एच पूर्व ६१८२/ स.अ.इ.व का., दि.३.७.२००१ रोजी अनुसार कार्य कार्यवाही झाली याबाबत अनुषंगिक पाच मुद्दयांवर माहिती मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १९.४.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी, तथा सहायक महापालिका आयुक्त, एच/पूर्व विभाग, सांताक्रूझ, मुंबई यांय्याकडे दि. ३.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १५.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु, आदेश पारित केले नाहीत. अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.८.२००७ रोजी द्वितीय

अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एच/पूर्व विभाग, श्री. चंदन शिवे तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, माहितीच्या अधिकारात सहायक आयुक्त, महानगरपालिका, एच/पूर्व विभाग यांनी दि.१९.१.२००१ व दि. १७.१०.२००१ रोजी जागेची पहाणी केल्याबाबतच्या अहवालाची प्रत, त्यानंतर श्रीमती शोभा सोनवणे यांनी पाठविलेल्या नोटीसीची प्रत इ. अनुषंगिक माहिती अपिलकाराने मागितली असल्याचे दिसून येते. श्रीमती शोभा सोनवणे यांनी केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित केले. अनधिकृत बांधकामास मुंबई महानगरपालिकेने कलम ३५१ ची नोटीस दिली व पुढील कार्यवाही कायदेशीरपणे करण्यात येईल असे कळविल्याचे दिसते. तसेच प्रकरण स्पेशल स्लम ट्रिब्युनल एमए क्र.७२/२००० अतर्गत न्यायप्रविष्ट असल्याचे सहाय्यक महापालिका आयुक्त यांनी अपिलकारास कळविले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या प्रकरणी न्यायालयाचा निर्णय झाल्यावर अपिलकारास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८५१/०२**

**श्री.आनंद हरिश्चंद्र सामंत,** **------ अपीलकर्ता**
**१/ब, मंदार, पांडुरंग वाडी, रस्ता क्र.५**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**प्रमुख अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या),**
**बृहन्मुंबई महानरगपालिका,**
**के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, ६ वा मजला,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप मुख्य अभियंता (पर्जन्य जल वाहिन्या),**
**बृहन्मुंबई महानरगपालिका,**
**के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, ६ वा मजला,**
**अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५८.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आनंद हरिश्चंद्र सामंत, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि.१०.५.२००७ रोजी अर्ज करुन गोरेगांव पूर्वेच्या पश्चिम द्रूतगती मार्ग ते पांडूरंगवाडी शेजारुन पुढे पश्चिम वाहणारा पिरामल नाल्याच्या सफाईच्या कामाबाबत अनुषंगिक पाच मुद्यांची माहिती मागितली होती.जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१३.६.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख अभियंता, (प.ज.वा.) के/पश्चिम विभाग, अंधेरी, मुंबई यांच्याकडे दि. १८.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दि. १८.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता, (प.ज.वा.) श्री. शिरिष प्रसाद तसेच अपिलकार आनंद सामंत हे हजर होते.

सुनावणीच्यावेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने माहितीच्या अधिकारात पिरामल नाल्याच्या सफाईच्या कामाबाबत अनुषंगिक पाच मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १३.६.२००७ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती सुस्पष्टपणे दिलेली असल्याचे अपिलातील कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन अपिलकाराच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास माहिती पुरविली असल्याचे सिध्द होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२०/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/६२७/०२**

**श्री. के. बी. कांबळे,** **------ अपीलकर्ता**
**देवनार अग्निशमन केंद्र,**
**देवनार म्युनिसिपल कॉलनी,**
**एच-१, रुम नं.२ व ३,**
**गोवंडी (प.), मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप आयुक्त (निवडणूक) यांचे कार्यालय,**
**महानरगपालिका मुख्यालय, ६ वा मजला,**
**फोर्ट, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रमुख अग्निशमन अधिकारी,**
**मुंबई अग्निशमन दल, ई विभाग कार्यालय,**
**दुसरा माळा, भायखळा, मुंबई- ४०० ००८.**

## - विवेचन -

.अपिलकार श्री. के.बी.कांबळे, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा प्रमख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, ई विभाग, भायखळा, मुंबई यांचेकडे दि. १७.२.२००७ रोजी अर्ज करुन, अग्निशमन दलातील भरती व ज्येष्ठतेबद्दल एकूण ९ मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१२.३.२००७ च्या पत्रान्वये मोजक्या शब्दात अपिलकारास माहिती दिली.

जन माहिती अधिका-यांने अपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (निवडणूक), बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई यांच्याकडे दि.२३.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. ११.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीकरिता प्रमुख अग्निशमन अधिका-यातर्फे उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, श्री.सावंत व श्री.नाईक तसेच अपिलकार हजर होते. माहितीच्या अधिकारातील मुद्दा क्र. ३ (१) (२) बाबत अपिलकाराने प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन समक्ष संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी. त्यानंतर अपिलकारास उपलब्ध माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २३.४.२००७ रोजी आदेश पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिका-यांनी कागदपत्र पहाणी करिता उपलब्ध करुन दिले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.

१४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, मुंबई अग्निशमन दल, फोर्ट, मुंबई, श्री. उदय केशव तटकरे, प्रमुख अग्निशमन अधिकारी, श्री. अनिल विष्णू सावंत तसेच अपिलकार श्री. के.बी.कांबळे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशमन अधिका-यांनी अपिलकारास संबंधित कागदपत्र तपासणीकरिता उपलब्ध करुन दिली नाहीत. अपिलकारास माहिती दिली नाही. अग्निशमन दलातील नवीन सहायक केंद्र अधिकारी पदाच्या भरतीकरिता ऑगस्ट, २००४ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिकेने एन.एस.बी.या संस्थेकडून उमेदवाराची निवड प्रक्रिया पूर्ण करुन एकूण ७३ उमेदवारांची यादी तयार करुन घेतली. सदर यादीत अपिलकाराचा मुलगा श्री.ईश्वर खंडू कांबळे हा पहिला होता. मुंबई अग्निशमन अधिकारी यांनी सहाय्यक केंद्र अधिका-यांची ज्येष्ठता यादी दोन वेळा आस्थापना आदेश काढून एका आस्थापना आदेशात श्री.ईश्वर कांबळे यांचे नांव दुस-या क्रमांकावर तर एका आस्थापना आदेशात सव्वीसाव्या क्रमांकावर ज्येष्ठता यादीत ठेवले. यावरुन अपिलकाराच्या मुलावर अन्याय झाला अशी अपिलकाराची धारणा झाली असल्याने त्यांनी अग्निशमन दलातील सहाय्यक केंद्र अधिकारी पदाच्या नवीन भरतीच्या ज्येष्ठता यादीसंबंधी माहिती मागितली. तरी या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराचा मुलगा श्री.ईश्वर खंडू कांबळे याचे नांव ज्येष्ठता यादीत क्रमांक १ वर होते तेव्हा अपिलकाराच्या मुलाच्या सेवा ज्येष्ठतेत दोन वेळा आस्थापना आदेश काढून बदल का करण्यात आला, याबाबत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्या- पासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगाकडे सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८३५/०२**

**श्री. शैलेश गांधी,** **------ अपीलकर्ता**
**बी-२, गोकुळ अपार्टमेंट,**
**पोदार रोड, सांताक्रूझ (प.), मुंबई- ४०० ०५४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,** **------- उत्तरवादी**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व**
**मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय,**
**मुंबई- ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व**
**मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय,**
**मुंबई- ४०० ०३२.**

## - वि वे च न -

. अपिलकार श्री. शैलेश गांधी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास, यांचेकडे दि.२८.६.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" सर्व दूध उत्पादकांनी दुधाचा पुरवठा निश्चित अशा डेअरीला करण्यासंबंधी शासनाने काही मार्गदर्शक तत्व अथवा शासन निर्णय निर्गमित केले असल्यास मार्गदर्शक तत्वे / शासन निर्णयाच्या प्रतींची मागणी केली होती. "

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, श्री.स.या.ठाकरे, यांचेकडे दि.१ ऑगस्ट, २००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे उक्त अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १७.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई, आयुक्त, दुग्धविकास कार्यालयातील

जन माहिती अधिकारी, श्री. हेमंत चव्हाण हे हजर होते. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांचेकडे दि.२८.६.२००७ रोजी अर्ज करुन दूध उत्पादकाकडून डेअरींना दूध पुरवठा करणेबाबत शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्व/ शासन निर्णयाची प्रत मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.२.८.२००७ च्या पत्रान्वये पुढील प्रमाणे माहिती दिली.

" अपिलकाराने मागितलेली माहिती ही आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाशी निगडीत असल्याने अपिलकाराचा माहितीचा अर्ज, आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यांत येत आहे. तरी याबाबत अपिलकाराने परस्पर त्या कार्यालयाशी संपर्क साधावा. "

जन माहिती अधिका-यांनी चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई, श्री.स.या.ठाकरे यांचेकडे दि.१ ऑगस्ट, २००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याचे कक्ष अधिकारी, श्री.फि.जा.डिसोझा यांनी अपिलकाराचे प्रथम अपील आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई यांच्याकडे दि.१३.८.२००७ रोजी पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविले. अपिलकार श्री.शैलेश गांधी यांनी मागितलेली माहिती ही शासन स्तरावरील असून, त्यामध्ये नमूद केलेले शासन निर्णयाची प्रत व दूध स्विकृतीबाबत शासनाचे निर्देश इ.बाबत शासनाशी निगडीत असल्याने आणि यासंबंधीचे आदेश शासन स्तरावरुनच निर्गमित केले जात असल्याने शासन स्तरावरुन अपिलकारास तात्काळ माहिती देणे आवश्यक आहे असे आयुक्त, दुग्धव्यवसाय यांच्या जनसंपर्क अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी श्री.ज.ल.पवार, अवर सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि. २२.८.२००७ च्या पत्रान्वये कळविले.

त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई, श्री. स.या. ठाकरे यांनी दि. २१.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिलकार हजर नव्हते. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" श्री. गांधी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि. २८ जून, २००७ च्या अर्जान्वये मागविलेल्या माहितीसंबंधीचे शासन निर्णय/ सूचना निर्गमित करण्यात आलेलया नाहीत. सबब, श्री.गांधी यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारची माहिती घ्यावयाची नसल्यामुळे श्री.गांधी यांचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि. २८ जून, २००७ चा अर्ज सदर आदेशान्वये निकाली काढण्यांत येत आहे. "

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकाराने मागितलेली माहिती शासन स्तरावरुन देणे आवश्यक होते. असे असूनही अपिलकाराचा अर्ज प्रथम अपील, जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयुक्त, दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई यांचेकडे त्यांच्याशी निगडीत असल्याचे नमूद करुन अनावश्यकरित्या पाठविले. यावरुन दोन्ही अधिका-यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जाची योग्य ती दखल वेळीच घेतली नाही. निष्काळजीपणे टोलवाटोलवी केली. अपिलकाराने मागितलेली माहिती शासन स्तरावरुन देणे आवश्यक असल्याचे आयुक्त, दुग्धव्यवसाय कार्यालयाने निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधी उलटून गेल्यानंतर दि. २१.९.२००७ रोजी सुनावणी आयोजित करुन दि. ७.१२.२००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निष्क्रियतेमुळे अपिलकारास माहिती देण्यास पाच महिन्याहून अधिक कालावधी झाला. तेव्हा जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीबद्दल त्यांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० (१) अन्वये रु,२५,०००/- इतकी शास्ती का लावू नये, तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही याबाबत त्यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशी का प्रस्तावित करु नये याबाबतचा खुलासा हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आंत प्रत्यक्ष भेटून लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा पुढील आवश्यक ती कारवाई करण्यांत येईल.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८६४/०२**

**श्री. दिलीप मोतीराम पिंपळकर,** **------ अपीलकर्ता**
**झो.नं.२१३,जी.टी.बी.नगर, रेल्वे लाईन,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**सरदार नगर नं.१, सायन-कोळीवाडा,**
**मुंबई- ४०० ०२२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,** **------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग,**
**९६, भाऊ दाजी रोड, माटुंगा,**
**मुंबई- ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/उत्तर विभाग,**
**९६, भाऊ दाजी रोड, माटुंगा,**
**मुंबई- ४०० ०१९.**

## - <u>वि वे च न</u> -

. अपिलकार श्री. दिलीप मोतीराम पिंपळकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एफ/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा, मुंबई यांच्याकडे दि. २६.६.२००७ रोजी अर्ज करुन झोपडपट्टीदादा मलिका मुरगन देवेन्द्र व मुरगन मनिकम देवेन्द्र या पती पत्नी यांनी अनधिकृतपणे झोपडी क्र.२/३, जी.टी.बी.नगर, रेल्वे लाईन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सरदार नगर-१, कोळीवाडा, मुंबई येथे अपिलकाराच्या घरासमोर दरवाज्यात अनधिकृतपणे दुकान घातले. याबाबत केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२५.५.२००७ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

" सदर दुकानाला कागदपत्रे कोणी दिली, याबाबतची माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. परंतु श्रीमती मुल्लीगा मुरगन देवेंद्र यांनी कागदपत्रे या कार्यालयाला सादर केली आहेत. त्याची छायांकित प्रत आपणांस योग्य ती फी भरल्यानंतर मिळू शकते. सदर दुकान चालू असल्यामुळे त्याला लायसन्स देण्यात आले

आहे. तसेच दि.२०.७.२००७ रोजी देण्यात आलेल्या भेटीनुसार सदर दुकान सुरु असल्यामुळे ते लायसन्स रद्द करता येणार नाही. सदर गुमास्ता लायसन्स वरिष्ठ निरीक्षक (दुकाने व आस्थापना) एफ/ उत्तर या विभागामार्फत देण्यात आलेले आहे. "

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एफ/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, माटुंगा, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. २२.६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता अपिललकार हजर होते. जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी खालीलप्रमाणे प्रतिपादन केले.

" श्री.मुरुगन मलिकम देवेंद्र यांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सरदार नगर नं.१, इमारत क्र.५ च्या मागे रिक्त असलेल्या झोपडयावर हया कार्यालयातर्फे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ व शासकीय अध्यादेश दि.२४.८.२००१ अन्वये दि.२४.६.२००६ रोजी "कारणे दाखवा नोटीस" बजावण्यात आली होती. सदर नोटीशीस अनुसरुन श्री. मुरुगम देवेंद्र यांनी १.१.१९९५ पूर्वीची मतदार यादी व झोपडीधारकांचे ओळखपत्र, सर्वेक्षण २००० मध्ये ओळखपत्रासाठी अर्ज केल्याची पावती या कार्यालयात सादर केली. प्रथमदर्शनी सदर झोपडे हे १.१.१९९५ पूर्वीचे असल्याचे दिसते. तसेच सदर झोपडे हे राज्य शासनाच्या जमिनीवर असल्याकारणाने पक्षकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची शहानिशा करुन पुढील योग्य ती कारवाई करण्यासंदर्भात मा. उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण निर्मूलन) शहर यांच्याकडे पाठविण्यात आलेली आहेत वरील परिस्थितीत आपणांस अपेक्षित असलेली माहिती संदर्भात वरील कार्यालयाशी पाठपुरावा करावा."

जन माहिती अधिका-याने अपिलकारास दि.२५.५.२००७ च्या पत्रान्वये वरीलप्रमाणे दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रर्थम अपील निकालात काढले. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.८.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २२.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एफ/उत्त विभाग, जन माहिती अधिकारी तथा, सहायक अभियंता (इ.व का.), एफ/उत्तर विभाग, माटुंगा, मुंबई हे हजर होते. अपिलकार श्री.दिलीप पिंपळकर हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार झोपडी क्र.२१३, जी.टी.बी.नगर, रेल्वे लाईन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सरदार नगर क्र.१, सायन कोळीवाडा, मुंबई येथे राहतात. अपिलकाराचा झोपडी क्र.२१३ च्या दरवाजासमोर श्री.मुरगन मणिकम देवेंद्र यांनी अतिक्रमण करुन ईस्त्रीचे दुकान चालू केले. अपिलकाराच्या घराची खिडकी बंद केली. अपिलकाराची जाण्यायेण्याची वाट बंद केली. गि-हाईकाचा अपिलकारास त्रास होतो. यामुळे त्रासून अपिलकाराने श्री. मुरुगन मणिकम देवेंद्र यांच्या दुकानाबाबत जन माहिती अधिका-यांकडे अनुषंगिंक माहिती मागितली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराच्या झोपडी क्र.२१३ च्या दरवाज्यात श्री. देवेंद्र मुरुगन यांनी घातलेल्या ईस्त्रीच्या दुकानाचे बांधकाम अधिकृत आहे की अनधिकृत आहे. अनधिकृत असल्यास सदर बांधकामाविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ अनुसार पुढील काय कारवाई करण्यात आली याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपिलकारास माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२२/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८७२/०२**

**श्री. बक्कर अब्दुल अलीम अहमद,** **------ अपीलकर्ता**
**ई/०२, मिनीनगर को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**एस.एन.दुबे रोड, रावळपाडा,**
**दहिसर (पूर्व), मुंबई- ४०० ०६८.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,** **------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत विभाग),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,**
**मामलेतदार वाडी, लिबर्टी गार्डन,**
**मालाड (प.), मुंबई- ४०० ०६४.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. बखर अब्दुल अलीम अहमद, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, पी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मालाड, मुंबई यांचेकडे दि. १९.१.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" राथोडी गाव, मार्वेरोड मालाड (प.) येथील वकील बंगल्याजवळ व्यापारी गाळयाच्या अनधिकृत बांधकामाबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. "अपिलकाराने विशिष्ट अशी माहिती मागितली नसल्याने, माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२१.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/एन विभाग, मालाड, मुंबई यांचेकडे दि.७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.१७.४.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपिलकार हजर होते. मार्वेरोड, मालाड (पूर्व), राथोडी गाव येथील अनधिकृत व्यापारी गाळयाबाबत अपिलकाराने माहिती मागितली होती. अपिलकाराने विशिष्ट अशा बांधकामाबाबत माहिती मागितलेली नसल्याचे अपिलकारास जन माहिती अधिका-यांनी यापूर्वी कळविले आहे. सदर पत्राची प्रत पुन्हा अपिलकारास द्यावी अशा प्रथम अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. अपील निकालात काढले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२५.४.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकउे दि.२७.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलकार श्री. बखर अब्दुल अलीम अहमद हे हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे सोयीचे व्हावे म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारासमवेत एकत्रितपणे अनधिकृत बांधकामाची तपासणी करावी. त्यानंतर अपिलकारास हवी असलेली उपलब्ध माहिती द्यावी. हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिका-यांनी एकत्रित पाहणी आयोजित करावी. त्यानंतर अपिलकारास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८६३/०२**

**श्री. लालचंद बी.जमनानी,** **------ अपीलकर्ता**
**शॉप नं.१४०, झुलेलाल मार्ग,**
**मेन बझार, मुलूंड कॉलनी,**
**मुंबई- ४०० ०८२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहाय्यक आयुक्त, टी वॉर्ड,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लाला देविदयाल मार्ग,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.**

**जन माहिती अधिकारी**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**लाला देविदयाल मार्ग,**
**मुलूंड (प.), मुंबई- ४०० ०८०.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. लालचंद बी.जमनानी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व का.) बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड, मुलूंड, मुंबई, यांच्याकडे दि.२२.१.२००७ रोजी अर्ज करुन, दुकान क्र.१४०, झुलेलाल नगर, मेन बाझार, सिंधी वसाहत, मुलूंड कॉलनी, मुंबई या मिळकतीच्या बाजूला रिकामन्या जागेवर अतिक्रमण करुन केलेले अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत दि. ३०.१०.२००६ व दि. १८.१२.२००६ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रारनीसंबंधीची कारवाईची माहिती मागितली होती. अपिलकाराने माहिती मागितलेला विषय अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांचेशी संबंधित असल्याने अपिलकाराची तक्रार त्या कार्यालयाकडे पुढील कारवाईकरिता पाठविल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. १४.२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलकराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, टी वॉर्ड, मुलूंड, मुंबई, यांच्याकडे दि. १०.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२१.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

" अपिलकाराच्या अर्जातील मुख्य मुद्दा अनधिकृत बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने कारवाई करण्याबाबत आहे. सदर तक्रारीबाबत अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांना कळविण्यांत आले. परंतु त्याचेवर

अवलंबून न रहाता अनधिकृत बांधकामाबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ अन्वये कारवाई सुरु करावी अशा सहाय्यक अभियंता (इ,व का.) टी/विभाग यांना सूचना दिल्या. "

अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याबाबत केलेल्या कारवाईची माहिती मिळाली नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९ जून, २००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, टी/विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुलूंड, मुंबई तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच प्रथम अपिलीय अधिका-यांनी सादर केलेला लेखी अहवाल व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

अपिलकार श्री.लालचंद जमनानी यांनी माहितीच्या अधिकारात पुन्हा दि.८.२.२००८ रोजीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अनधिकृत बांधकाम दि.८.२.२००८ रोजी निष्कासित केले असल्याचे दि.७.३.२००८ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले. त्यावर अपिलकाराने दि.७.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.७.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. अपिलकारास दि.१२.५.२००८ च्या पत्रासोबत आदेश पाठविले. यावरुन असे दिसून येते की, अपिलकाराने तक्रार केलेले अनधिकृत बांधकाम उशिराने निष्कासित करण्यांत आले. याबाबत अपिलकारास माहिती दिली. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी सदर प्रकरणी विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही केलेली नाही. उभयांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अंमजबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७७४/०२**

**सचिव/ अध्यक्ष,** **------ अपीलकर्ता**
**अल्पना अपार्टमेंट को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**१४७-अे, देसाई वाडी, दोशी वाडीजवळ,**
**एल.बी.शास्त्री मार्ग, घाटकोपर (प.),**
**मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (जल कामे),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.**

## - वि वे च न -

अपिलकार सचिव/अध्यक्ष, अल्पना अपार्टमेंट यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१)अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता(जल कामे), बृहन्मुंबई महानगरपालिका,एन विभाग, घाटकोपर, मुंबई यांचेकडे दिनांक १३.३.२००७ रोजी अर्ज करुन संस्थेची (१)डी/६७९०००५, (२)इओ/६५०००५, (३) ई-४/९६०००१, आणि (४) डी-६७९००१७ ही चार पाण्याची मीटर बदली केल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

माहितीच्या अधिकारातील अर्जावर सही केलेल्या व्यक्तिंची नांवे लिहिलेली नाहीत. अर्ज करणा-या व्यक्तिचे अर्जावर नांव नसल्याने अर्जाचा विचार करता येत नाही. अर्जाचे अवलोकन केले असता अपिलकारास कोणती विशिष्ट माहिती हवी आहे हे लिहिलेले नाही. त्यामुळे अर्ज निकालात काढण्यात येतआहे असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. २६ मार्च, २००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एन/विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,घाटकोपर, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.१४.३.२००७ ची सुनावणीची नोटीस उशिरा पाठविली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती

आयोगाकडे दि.२५.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त, एन/विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,घाटकोपर, मुंबई, श्री.वसंत प्रभू, जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, एन/विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,घाटकोपर, मुंबई, श्री.दिगंबर नगरकर तसेच अपिलकार श्री. प्रेमजी एस. गडा, सचिव, अल्पना अपार्टमेंट हे हजर होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अल्पना अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्थेची पाण्याची एकूण चार मीटर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमाणकानुसार संस्थेच्या स्वतःच्या खर्चाने बृहन्मुंबई महापालिकेच्या मान्यताप्राप्त एजन्सीकडून जुने मीटर बदलून नवीन मीटर बसविली आहेत. नवीन बसविलेली पाण्याची मीटर तपासणी करुन (testing) ती चांगल्या स्थितीत चालू असल्याची खात्री करुन घेण्याबाबत उक्त संस्थेच्या सचिव/ अध्यक्षांनी जन माहिती अधिका-यांकडे दि. ३.१०.२००६ च्या पत्रान्वये विनंती केली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संस्थेची पाण्याची मीटर बदलल्यानंतर दिलेल्या बिलात वापर आणि प्रत्यक्ष आकारणी यामध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याची उक्त संस्थेच्या सचिव/ अध्यक्ष यांची तक्रार आहे. तसेच, पाण्याचे मीटर बदलण्यापूर्वी आणि मीटर बदलल्यानंतरही average bill बृहन्मुंबई महानरपालिका संस्थेला पाठवित आहे. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी संस्थेच्या तक्रारीचे योग्यरित्या निवारण केलेले दिसत नाही. याप्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) नुसार विशिष्ट अशी माहिती मागितलेली नसून अपिलकाराचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीबाबत (Grievance) गा-हाणे आहे. सदर बाब उक्त माहितीच्या अधिकारात मोडत नाही. परंतु, संस्थेची पाण्याची आवश्यक गरज लक्षात घेता, जन माहिती अधिका-यांनी उक्त सहकारी गृहनिर्माण संस्थेने बसविलेल्या नवीन पाण्याच्या मीटरची तांत्रिक तपासणी करुन संस्थेचे गा-हाणे तात्काळ दूर करावे अशी राज्य माहिती आयोगाची शिफारस आहे.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई /दिनांक :-२३/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८६२/०२**

**डॉ.सतीश चेलाराम कोकळ,** **------ अपीलकर्ता**
**४/१२, विवेकानंद को.ऑप.हौ.सो.**
**टी.एच.कटारिया मार्ग,**
**माहीम, मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र चेलवे मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/नॉर्थ विभाग,**
**हरिश्चंद्र चेलवे मार्ग, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

.

## - <u>वि वे च न</u> -

अपिलकार डॉ.सतीश चेलाराम कोकळ, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६(१)अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.) जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, दादर, मुंबई यांचेकडे दि. १२.३.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती. अपिलकार हे ४/१२ विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्था, माहीम, मुंबई, इमारत क्र.४ मध्ये पहिल्या मजल्यावर राहतात. त्यांच्या सदनिकेत होत असलेल्या पाणी गळतीबाबत दि.८.१.२००७ व ६.३.२००७ रोजीच्या तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, दादर, मुंबई यांचेकडे दि.१२.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.७.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२२.९.२००८ रोजी सुनावणी

आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, जी/उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, दादर, मुंबई हे हजर होते. अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्था, माहिम येथील इमारत क्र.४, सदनिका क्र.१२ मध्ये भिंतीमधून, स्वयंपाकघराच्या छतातून, छन्नमार्गातून खूप प्रमाणात गळती होते. सदर गळती दुस-या मजल्यावरील श्री.प्रकाश बच्चुमल गागवाणी (४/१४) आणि तिस-या मजल्यावरील श्री.राम मगलानी (४/१६) यांच्या सदनिकांमधून होते. सदर गळती दुरुस्तीचे काम सत्वर करुन घेण्याबाबत अपिलकाराने विवेकानंद सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांना दि. ९.५.२००६, ९.११.२००६, ३.१२.२००६ रोजी अर्ज करुन विनंती केली होती. परंतु उक्त संस्थेच्या सचिवांनी दाद दिली नाही. म्हणून अपिलकाराने जन माहिती अधिका-यांकडे गळती दुरुस्तीचे काम करण्याबाबत तक्रार केली होती. दरम्यान अपिलकाराने श्री.आर.पी.दारुवाला, वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून सदनिकेतील गळतीसंबंधी तांत्रिक पाहणी अहवाल तयार करुन घेतला. सदनिकेतील गळतीचे प्रमाण ५०% असल्याबाबत वास्तुशास्त्रज्ञांच्या तांत्रिक अहवालानुसार दिसून येते. सदर गळती थांबविण्याकरिता आर.सी.सी.चे नोंदणीकृत कन्सलटंटकडून त्यांच्या देखरेखीखाली काम करुन घ्यावे. सदर कामाकरिता महानगरपालिकेच्या मान्यतेची आवश्यकता नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास दि.१६.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले. वास्तुशास्त्रज्ञांच्या अहवालानुसार वरील मजल्यावरील ज्या सदनिकाधारकांच्या टॉयलेटमधून गळती आहे, त्या सदनिकाधारकांनी गळती दुरुस्तीच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ५०% खर्च, २५% त्रस्त सदनिका धारक आणि २५% खर्च सहकारी संस्थेने सोसणे आवश्यक असल्याचे अहवालात नमूद केले. वरील बाब लक्षात घेता सदर प्रकरण माहितीच्या अधिकारात मोडत नाही. अपिलकाराने आपले गा-हाणे (Grievance) सक्षम प्राधिका-यांकडे मांडावे. सबब, मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२३/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७८५/०२**

**श्री.सी.आर.रामचंद्रन,** **------ अपीलकर्ता**
**९/२४, श्री नारायण को.ऑप.हौ.सो.लि.**
**फ्लॅट नं.२३ व २४, रिफल रेंज,**
**घाटकोपर (प.), मुंबई- ४०० ०८६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**जवाहर रोड,घाटकोपर (पू.), मुंबई- ४०० ०७७.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,**
**जवाहर रोड,घाटकोपर (पू.), मुंबई- ४०० ०७७.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री.सी.आर.रामचंद्रन, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१)अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर, मुंबई यांचेकडे दि. ५.५.२००७ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" श्री.नारायण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.प्लॉट क्र.२३ व २४, घाटकोपर (प.), मुंबई येथे अपिलकार क्र.९/२४ या सदनिकेत राहतात. त्यांच्या वरच्या मजल्यावरील सदनिकाधारक क्र.१३/२४ यांनी अंतर्गत काही फेरफार केल्यामुळे अपिलकाराच्या सदनिकेत खूप गळती आणि स्वयंपाकघराच्या सज्जाचे नुकसान झाले. त्याकरिता अपिलकाराच्या सदनिकेस भेट देवून तपासणी करावी. याकरिता अपिलकाराने, जन माहिती अधिका-यां कडे एकूण आठ तक्रार अर्ज दिले. याबाबत केलेल्या कारवाईची अनुषंगिक एकूण सहा मुद्दयांवर माहिती मागितली. "

मुद्दा क्र. ए संबंधी जागेच्या पहाणीच्या अहवालाच्या प्रतीसाठी कार्यालयात रु.४/- भरुन प्राप्त करुन घ्यावी. मुद्दा क्र. बी संबंधी स्वयंपाक घराचा सज्जा स्वयंपाक घरामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत परवानगी

दिली नसल्याने परवानगी देण्याच्या पत्राची प्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मुद्दा क्र. सी व ई संबंधी मागितलेली माहिती, माहितीच्या अधिकारासंबंधी नसल्याने माहिती उपलब्ध करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मुद्दा क्र. डी व एफ संबंधी विकास नियंत्रण नियम, १९९१ ची प्रत (Development Control Rule, १९९१) शासकीय मुद्रणालयातून प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ५.६.२००७ च्या पत्रान्वये अपिलकारास कळविले.

जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, घाटकोपर, मुंबई यांचेकडे दि.६.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी खालीलप्रमाणे अपिलकारास माहिती दिली.

" अपिलकार आणि कार्यालयातील कर्मचा-यांसमवेत जागेची संयुक्तरित्या पहाणी करण्यांत आली. संयुक्त पहाणीत असे दिसून आले की, अपिलकाराने त्यांची स्वतःची सदनिका क्र.९/२४ अंतर्गतरित्या सुस्थितीत ठेवलेली नाही. त्यामुळे छतास तसेच बाजूच्या भिंतीस भेगा पडल्या आहेत. सदनिका वास्तव्ययोग्य करण्यासाठी सदनिकेची आवश्यक ती दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारास दि.१५.१.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२३.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, एन विभाग, घाटकोपर, मुंबई, श्री.जे.एस.गहीगडमल, तसेच अपिलकार श्री.सी.आर.रामचंद्रन हे हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलकार रहात असलेल्या श्री.नारायण सहकारी गृहनिर्माण संस्थेतील इमारतीत अपिलकाराच्या वरच्या मजल्यावरील १३/२४ सदनिकाधारक, श्री.के.एस.कृष्णन यांनी अनधिकृतरित्या " १३.२"x"२.०४"x (एचटी "२.६") असे बांधकाम करुन

बाल्कनीचा स्वयंपाकगृह म्हणून वापर करण्यात येत असल्याबाबत सहायक अभियंताच्या दि. ८.६.२००७ च्या पहाणी अहवालानुसार दिसून येते. यामुळे अपिलकाराच्या स्वयंपाक घराच्या सज्जावर भार आला असून त्यासाठी योग्य तो आधार नसल्याने अपिलकाराची बाल्कनी केव्हाही पडू शकते अशी अपिलकाराची तक्रार असून, अनधिकृत बांधकामाविरुध्द महानगरपालिकेच्या नियमानुसार कारवाई करण्याची अपिलकाराची मागणी दिसते. परंतु, मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५१ अन्वये नोटीस देवून पुढील योग्य ती कारवाई जन माहिती अधिका-यांनी केल्याचे व अपिलकारास कळविल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपिलकाराच्या मागणीनुसार अनधिकृत बांधकामाबाबत नियमानुसार केलेल्या कारवाईची माहिती अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत जन माहिती अधिका-यांनी द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/७३८/०२**

**श्री. वसंत मारुती पालकर, ------ अपीलकर्ता**
**८९/९१, जुनी हनुमान लेन,**
**काळबादेची, मुंबई- ४०० ००२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सहायक महापालिका आयुक्त,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग,**
**चंदनवाडी, मुंबई- ४०० ००२..**

**- वि वे च न -**

अपिलकार श्री.वसंत मारुती पालकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१)अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ.व का.), सी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे दि. ७.११.२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

" सहाय्यक अभियंता (इ.व का.) सी/विभाग यांनी तळमजला, ८९/९१, दुकान क्र.७ अजय अग्रवाल, जुनी हनुमान गल्ली, काळबादेवी, सी/विभाग येथील सदर जागेचा केलेला पहाणी अहवाल, काढलेले निष्कर्ष, सदर प्रकरणाच्या कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. "

अपिलकाराने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार वगळता) कोणत्याही दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत माहितीपोटी शुल्क रु.४/- एवढी रक्कम रोखीने भरुन सात दिवसांचे आंत माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि. ४.१२.२००६ च्या पत्रान्वये कळविले.

मागणी केल्याप्रमाणे कागदपत्राच्या साक्षांकित प्रती मिळाल्या नाहीत. डायरी नोंदवहीची प्रत तसेच वस्तुनिष्ठ अहवालाची प्रत मिळाली नाही. म्हणून अपिलकाराने दि.२०.१.२००७ रोजी प्रथम अपिलीय

अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, चंदनवाडी, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.८.३.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलकार हजर होते. जुनी हनुमान गल्ली, सी/विभाग, तळमजला, ८९/९१, दुकान क्र.७ ची पहाणी केलेल्या अहवालाची अपिलकाराने मागणी केली. सदर जागेची पहाणी केली असता त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही. त्यामुळे अहवाल तयार करण्यात आला नाही. स्टॉप वर्क रजिस्टमध्ये नोंद घेतली नाही. त्यामुळे उक्त जागेवर अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही अशी अपिलकारास माहिती दिली. अपिलकाराने साईट व्हिजीट बुकच्या संबंधित पानाची छायाप्रत मागितली. तसेच स्टॉप वर्क बुकाची पहाणी करण्याची मागणी केली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

" ईमारती विभागाकडून साईट व्हिजीट बुक ठेवले जात नाही. अपिलकारास स्टॉप वर्क बुकाची, जन माहिती अधिका-यांनी तपासणी करण्यास परवानगी द्यावी, " असे आदेश पारित केले.

जन माहिती अधिका-यांनी जागेच्या पहाणी अहवालाची, डायरी नोंद उपलब्ध करुन दिली नाही. हेतुपुरस्सर खोटी माहिती दिली. त्यामुळे अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे उक्त अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर पहिल्यांदा दि.२२.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधित जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते म्हणून याप्रकरणी पुन्हा दि. २३.९.२००८ रोजी एक महिन्यानंतर सुनावणी आयोजित केली. यावेळीही बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कोणीही अधिकारी हजर राहिले नाहीत. अपिलकार श्री.वसंत पालकर हजर होते.

सुनावणीचेवेळी अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जुनी हनुमान गल्ली, काळबादेवी, मुंबई येथील इमारत क्र.८९/९१, दुकान क्र.७ बी, तळमजला, येथील plinth Level खाली करुन अनधिकृतपणे पोटमाळयाचे बांधकाम करीत आहेत म्हणून अपिलकाराने श्री.विजय गोवर्धनदास आणि श्री. अजय अग्रवाल यांच्याविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीबाबत संबंधित जागेच्या फोटोप्रतीही

दिल्या आहेत. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती अपिलकाराने मागितली होती. यासंबंधी जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दिलेली माहिती खोटी असल्याचा अपिलकाराचा दावा आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जप माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलकारासमवेत जागेची संयुक्त पहाणी करावी. त्यानंतर वस्तुस्थितीवर आधारित उक्त जागेत अधिकृत/ अनधिगृत बांधकाम केले किंवा कसे, याबाबत अपिलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/८९८/०२**

**श्री. एस.बी. गुलाटी, ------ अपीलकर्ता**
**६, शरद अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.लि.**
**टिळक नगर, ६ वा रोड,**
**गोरेगांव (प.), मुंबई- ४०० ०६२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, ------- उत्तरवादी**
**सहकारी संस्था (३),पश्चिम उपनगरे,**
**गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्र.६९,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, पी विभाग, मल्होत्रा हाऊस,**
**६ वा मजला, जीपीओ समोर, मुंबई-४०० ००१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. स.बी. गुंलाटी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पी विभाग, मल्होत्रा हाऊस, मुंबई यांचेकडे दि.१७.५.२००७ रोजी अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

" सहाय्यक व्यवस्थापक सहकारी संस्था, पी/विभाग, मल्होत्रा हाऊस, मुंबई यांच्या आदेशानुसार शरद अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. करिता श्री.पी.डी.राणे (सेवानिवृत्त सहाय्यक व्यवस्थापक) यांची प्रशासक म्हणून नेमणूक केली होती. सदर प्रशासकांनी संपूर्ण कालावधीचा सादर केलेल्या अहवालाची प्रत मागितली होती. "

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.१४.६.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती विसंगत (In consistent) असल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३), गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दि.२६.७.२००७ रोजीप्रथम अपील दाखल करण्यात आले. सदर अपिलावर दि.२३.८.२००७ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२४.९.२००८ रोजी

सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीची नोटीस युपीसीने पाठवूनही प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी, तसेच अपिलकार हजर नव्हते.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, उक्त सहकारी संस्थेचे प्रशासक, श्री.पी.डी.राणे यांनी संपूर्ण कालावधीच्या सादर केलेल्या अहवालाच्या प्रतीची अपिलकाराने मागणी केली होती. परंतु, जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती देण्याऐवजी प्रशासकाला दिलेल्या Joining पत्राची प्रत दिली. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतु आदेश पारित केले नाहीत. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास उक्त संस्थेच्या प्रशासकाने सादर केलेल्या संपूर्ण कालावधीच्या अहवालाची प्रत द्यावी.

**<u>आदेश</u>**

**सबब, अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-२४/०९/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००८/७३/०२**

**श्री. इम्रान युनुस आझमी,** **------ तक्रारदार**
**आझमी हाऊस, ४४/ई/८५,**
**फुर्कानिया चौक, कमला रामन नगर,**
**गोवंडी, मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई- ४०० ०५१.** **------- उत्तरवादी**

## - वि वे च न -

तक्रारदार श्री.इम्रान युनुस आझमी, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १८ (१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे, गैरतक्रारदार मुख्याधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे, मुंबई यांनी मागितलेली मुद्देनिहाय माहिती दिली नसल्याने दि. ५.१०.२००७ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दि. २५.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार, सह मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, (म्हाडा), श्री. अ.र.काळे तसेच तक्रारदार हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच तक्रारीमधील कागदपत्राची तपासणी करण्यात आली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

तक्रारदार श्री.इम्रान आजमी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये गैरतक्रारदार तथा मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, म्हाडा यांचेकडें दि.६.१०.२००६ रोजी अर्ज करुन, सर्व्हे क्र, १३८/१ पैकी मौजे मानखुर्द, मुंबई या सर्व्हेमध्ये म्हाडाच्या ताब्यात असलेली १३३९१२ चौ.मीटर क्षेत्रफळाच्या जागेमध्ये प्राथमिक/ माध्यमिक शाळा, महाविद्यालय व इतर शैक्षणिक कार्यासाठी आरक्षित ठेवलेल्या जागेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. गैरतक्रारदार तथा मुख्य अधिकारी यांच्यावतीने

कार्यकारी अभियंता, घाटकोपर विभाग, मुंबई मंडळ यांनी दि. २.११.२००६ च्या पत्रान्वये संक्षिप्त स्वरुपात माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, तक्रारदारास मागितलेली माहिती मुद्देनिहाय सविस्तरपणे दिलेली दिसत नाही. तक्रारदाराची सविस्तर मुद्देनिहाय माहितीची मागणी आहे. सदर बाब लक्षात घेता या प्रकरणी मी गैरतक्रारदारास असे आदेश देतो की, तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.१०.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीत नमूद मुद्दयाबाबत, मुद्देनिहाय सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत तक्रारदारास माहिती द्यावी. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/१०/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/९१५/०२**

**श्री. आबाजी बली चव्हाण,** **------ अपीलकर्ता**
**१२, धनजी मनजी पटेल चाळ,**
**खोत कुवा रोड, धनजीवाडी,**
**मालाड (पूर्व.), मुंबई- ४०० ०९७.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## - वि वे च न -

अपिलकार श्री. आबाजी बळी चव्हाण, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे दिनांक १७.४.२००७ रोजी अर्ज करुन, (१) पी.एन./खाजगी/००६/१९९४/०३२५/झो.पु.पा. (२)झोपुपा/ डेप्युटी सी.ई./५४/पी.एन./ए.एल.को.आई २५-९/१९९७, मालाड (पूर्व), धनजीवाडी, मुंबई, एसआरडी/ एसआरएफ योजनेतील आणि महसूल विभागातील गैरव्यवहाराबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अपिलकाराच्या दि. २०.२.२००६ च्या पत्रास अनुसरुन पूर्वी मुद्देनिहाय माहिती दि.१६.३.२००६ च्या पत्रान्वये दिली. दि.१७.४.२००७ च्या अर्जाबाबत माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने दि. १.६.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांनी अपिलकारास दि. ७.७.२००७ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे माहिती दिली.

" अपिलकाराच्या माहितीच्या अधिकारातील अर्जावर उपजिल्हाधिकारी कक्षातर्फे पत्र क्र.झोपुप्रा/उजि / शा.मा.अ./कावि-६०२/२००७/६९४, दि. १५.५.२००७ व सहाय्यक निबंधक, झोपुप्रा यांनी पत्र क्र. मुंबई/सनि/झोपुप्रा/

शा.मा.अ./११८/ सन २००७, दि. १७.५.२००७ अन्वये अपिलकारास लेखी कळविलेले असल्याने त्यांचे अपील रद्द केले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या उत्तराने व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१०.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. २९.९.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, डॉ.बी.एन.बास्टेवाड, प्रथम अविलीय अधिकारी (झोपुप्रा) श्री. वझरकर तसेच अपिलकार श्री.आबाजी चव्हाण हजर होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, धनजीवाडी गृहनिर्माण संस्था मालाड, विकासक श्री.योगेश मेहता, आर्किटैक्ट, श्री. सुभाष चावडा यांनी झोपडपट्टीधारकांचा १४९५ विकास योजनेत दि.११.११.१९९३ रोजी मंजुरी घेतली. दि. २२.२.१९९४ रोंजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेतले. भ्रष्टाचार व गैरव्यवहार करुन विक्री केली. याबाबत अपिलकाराने अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा यांनी दि.१५.५.२००७ व दि.१७.५.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, झो.पु.प्रा.यांनी नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले. परंतु अपिलकारास दिलेल्या माहितीची प्रत द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्यावेळी आयोगास जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केली नाही. यावरुन मागितलेली माहिती अपिलकारास दिली असल्याची खात्री होत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर आदेश प्राप्त झाल्या पासून ३० दिवसांचे आंत अपिलकारास माहिती द्यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई.**

**मुंबई,**
**दिनांक :-०३/१०/२००८.**